
श्री

मे–जून १९९१

# साईलीला

Veena. N. Kamal

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक



## विश्वस्त मंडळ

अध्यक्षा
**डॉ. लेखा पाठक**

श्री. हेमराज शहा
श्री. ब्रिजमोहन भामशा
श्री. शिवराम शिंदे
डॉ. एकनाथ गोंदकर
श्री. भीमाशंकर खांबेकर
श्री. दादासाहेब रोहमारे (पाटील)
श्री. उत्तमराव शेळके
श्री. कारभारी देवकर
श्री. मोतीराम पवार
प्रा. ना. स. फरांदे
श्री. दिलीप अ. शिंदे
श्री. श्रीपतराव जाधव
श्री. मनोहर गोगटे
श्री. पृथ्वीराज रा. आदिक
श्री. राजीव प्र. कुळकर्णी
श्री. प्रभाकर तु. बोरावके
श्री. बाबुराव नरोडे (पाटील)
श्री. प्रभाकर बी. बोरावके
श्री. सोपान धोरडे
श्री. अनंतकुमार पाटील
श्री. प्रशांत व्यं. हिरे
श्री. अण्णासाहेब म्हस्के
श्री. गोपिनाथ व. कोते (पाटील)
श्री. मोहन मो. जयकर


---

## श्री साईभक्तांना नम्र आवाहन

शिरडी संस्थान हे देशभर भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील श्री साईबाबांच्या लाखो भक्तांचे तीर्थयात्रेचे व श्रद्धेचे स्थान झालेले आहे. प्रत्येक दिवसागणिक भाविकांची वाढती लोकप्रियता या संस्थानला लाभली असून त्याची भारतातील एक प्रमुख विश्वस्तनिधि म्हणून गणना होत आहे.

गेली कांही वर्षे साईभक्तांच्या सतत वाढणाऱ्या गर्दीमुळे श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या विविध सोयींवर अतोनात ताण पडत आहे. या लाखों भाविकांना शिरडीचा निवास सुखाचा व सोईचा व्हावा म्हणून संस्थानने सुखसोईंमध्ये वाढ करण्याचे ठरविले आहे.

"साईबाबा भक्त निवास" अशी ५०० भाविक कुटुंबांची राहण्याची सोय करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल उचलले आहे. या खोल्यांमधून भाविकांना सर्व सोयी स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येतील. माफक दरात येथे भाविकांची राहण्याची सोय केली जाईल. याशिवाय सध्या उपलब्ध असलेल्या सभागृहापेक्षा मोठे, अशा २ सभागृहांची योजना असून या सोयीमुळे सुमारे ३,५०० अतिरिक्त भाविकांची उत्तम व्यवस्था होणार आहे. ८० खोल्या असलेल्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होत असून तिचा लवकरच उद्घाटन समारंभ करण्यात येणार आहे. तसेच रात्रंदिवस सेवा चालू असलेले एक खाद्य-पेयगृहही त्याच जागेत असेल.

भाविकांची प्रत्यही वाढणारी संख्या लक्षात घेऊन मंदिराच्या परिसराच्या नूतनीकरणाची योजना त्यानंतर हाती घेतली जाणार आहे. या नूतनीकरणामुळे श्री साईबाबांचे दर्शन भाविकांना सुलभतेने व सहजतेने घेता येणार आहे. त्यांचा सध्याचा त्रास त्यामुळे कमी होईल.

शिरडी संस्थानच्या वतीने सध्याच्या १०० खाटांच्या इस्पितळाचा विस्तार, वैद्यकीय महाविद्यालय अशा आणखी योजना हाती घेण्यात येणार आहेत. इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबांच्या कृपेने व आशीर्वादाच्या बळावर संस्थानने वरील नमूद केलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. आपली मदत आम्हाला हरतऱ्हेने हवी आहे. भारताच्या उज्ज्वल सांस्कृतिक परंपरेचे संवर्धन या प्रकल्पाकरिता देणगी दिल्याने होणार आहे.

शिरडी संस्थानच्या वतीने मा. अध्यक्षा आपणाला या कार्याकरिता उदारहस्ते मदत करण्याचे विनम्र आवाहन करीत आहेत.
आपल्या देणग्या खालील पत्त्यावर पाठवाव्यात :–

कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी
मु. पो. : शिरडी, तालुका : कोपरगांव, जिल्हा : अहमदनगर.

सूचना : चेक "श्री साईबाबा संस्थान, शिरडी" या नावाने पाठवावेत.

Veena. N. Kamat.
Wadala. B'bay-37.

श्री

# साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

श्री साईबाबांच्या
दिव्य संदेशाचा प्रसार

वर्ष ७० वे) मे-जून १९९१ (अंक २-३

भारतीय अधिक वैशाख-निज वैशाख-ज्येष्ठ, शक १९१३

संपादक
कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी

मानद सहाय्यक कार्यकारी संपादक
सौ. प्रविणा कांबळी, विजय क्षीरसागर, सुरेंद्र देसाई

-: कार्यालय :-

पोस्ट-शिरडी-४२३१०९, जिल्हा-अहमदनगर.
साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४. दूरध्वनी-४१२२५६१

वार्षिक वर्गणी- रु. २५/-, आजीव सभासद वर्गणी- रु. ५००/-,
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी- रु. ५००/- (टपाल खर्चासहित), किरकोळ अंक- रु. ५/-

या मासिकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

१४०

न होई कदापि भ्रमनिरसन। लक्षुनियां मन दुजे ठायीं।।
नाहीं ठावा झाला निग्रह अभ्यास। त्यामुळें हा त्रास उभारला।।
वाचाया आवडे पुस्तकें थोरांचीं। गुरुवीण श्रीची फोड नसे।।
दास म्हणे झाली भूल या नराची। म्हणुनियां खांची पडलोसें।।

१४१

मनाचे चिंतनें सुखदुःख वाढे। मन काढी ओढे हयातींत।।
मन हें आधार मन हें निर्धार। मना ना विचार सारासार।।
मन पापरूप मन दुःखरूप। मना ये हुरूप बुडवाया।।
मन जरी शांत मना येई अंत। मन हें निर्भ्रान्ति राहूं शके।।

१४२

कृपा तुझी पूर्ण असे। काय तें उणें रे।। कृपा० ।।धृ०।।
जवळिं धरियलें जयासि। हातभार तया देसि।।
अनुभवतें मम मानसिं। काय तें उणें रे।। कृपा० ।।
सूत्रधारि हृषीकेशी। गारुड तव दाखविसी।।
भक्तजनां तोषविसी। काय तें उणें रे।। कृपा० ।।
सांई गुरुवेषधारि। प्रगटलासि भूमिवरी।।
दासि नित्य स्मरण करी। काय तें उणें रे।। कृपा० ।।

१४३

नाम घेतां रात्रीं नीज येई आड। शरीराचे लाड पुरवाया।।
म्हणूनि राहिलों उभा हा सामोरीं। राम कृष्ण हरी नाम घेत।।
वय सारें गेलें झोपेंत निघोनी। जन्मासी येउनी काय केलें।।
भजनमार्गांत लागे लक्ष्य देवा। पायांचा तो ठेवा देईं दासा।।

## 'श्री साईलीला' लेखक-कवींस निवेदन

गद्यलेखन

'श्री साईलीला'कडे साहित्य पाठविताना 'श्री साईलीला' लेखकांनी पुढील प्रकारात आपले लिखाण बसते का, याची दक्षता घ्यावी.

दिवंगत संत महात्म्यांवर आधारित समयोचित लिखाण.

श्री साईबाबांचे पूर्व व समकालीन संतांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली व श्री साईबाबांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली यातील साम्य व भेद.

श्री साईबाबांचे उपदेश, बोल व घटना यांविषयी आपल्याला झालेले आकलन, उमगलेला विश्लेषणात्मक अर्थ.

श्री साईबाबांचे उपदेश आचरण करताना आलेले अनुभव.

श्री साईबाबांच्या कृपाछायेचे अनुभव.

श्री साईबाबांच्या जीवनावरील अन्य भाषेतील समर्पक लिखाणाचे अनुवाद (मूळ लेखकाचा, पुस्तकाचा संदर्भ देणे आवश्यक).

बालसाईभक्तांसाठी हलक्या-फुलक्या, सहज-सोप्या भाषेत आध्यात्मिक लिखाण.

कवितालेखन

कवींनी आपले दर्जेदार काव्यच 'श्री साईलीला'ला पाठवावे. वृत्त, ताल, छंद वा मुक्त छंद इत्यादी आकृतीबंधात न बसणाऱ्या कविता स्वीकारणे शक्य होणार नाही. यासाठी कवितांची रचना व आशय याकडे अधिक लक्ष पुरवावे.

'श्री साईलीला'करिता साहित्य लिहिताना कागदाच्या दोन्ही बाजूस पुरेसा समास सोडावा, दोन ओळींच्या मध्ये पुरेसे अंतर ठेवावे, कागद जीर्ण-विजीर्ण असू नये, आशय व्यक्त करताना तो मुद्देसूद व सलगपणे मांडावा.

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. बाबांचे अनुभव | ४ |
| २. भक्तांची अपार श्रद्धा व बाबांचे अलोट प्रेम | ६ |
| ३. श्री साईंचे सत्य चरित्र –अध्याय १३ व १४ | ८ |
| ४. जुन्यातलं सोनं | २६ |
| ५. साईभक्तांचे अनुभव | ३९ |
| ६. साईछाया | ४२ |
| ७. बाबा असता मागे-पुढे भय ते कसले | ४३ |
| ८. ज्याच्या पाठी साई जगी त्यास भय नाही | ४३ |
| ९. बाबांच्या कृपेने अशक्य ते शक्य झाले | ४३ |
| १०. माय-माऊली | ४३ |
| ११. सबुरी | ४४ |
| १२. आषाढी एकादशीला बाबांचा प्रसाद | ४४ |
| १३. ....आणि मला चांदभाईच्या अनुभवाची आठवण झाली | ४४ |
| १४. जेथे जातो तेथे तू माझा सांगाती | ४४ |
| १५. कल्पनातीत अनुभव | ४४ |
| १६. ही सारी बाबांची कृपा | ४५ |
| १७. नित्य घ्या प्रचीत अनुभवे | ४५ |
| १८. मागे-पुढे उभा माझा साईनाथ | ४५ |
| १९. साई म्हणे तोचि, तोचि झाला धन्य झाला जो अनन्य माझ्या पायी | ४६ |
| २०. साई तारी त्याला कोण मारी | ४७ |
| २१. हाकेला साई धावूनी येती | ४७ |
| २२. साई पावला | ४७ |
| २३. साईंचे परमभक्त कै. तात्यासाहेब नूलकर | ४८ |
| २४. माधवराव उर्फ शामा देशपांडे-शिरडीकर –अल्पचरित्र | ५३ |
| २५. श्री क्षेत्र कनकेश्वर | ५५ |
| २६. सागर-सरिता | ५८ |
| २७. श्री साईबाबांचा सुलभ व प्रेमळ उपदेश | ५९ |
| २८. श्री साईबाबांच्या जीवनकथा | ६० |
| २९. स्मरा नित्य साई सद्गुरुचे नाम | ६३ |
| ३०. आपुले ते आपुलियासंगे। दुजियाचे ते दुजियासंगे।। | ६४ |

## संपादकीय

# बाबांचे अनुभव

वाट चुकलेल्या समाजाला योग्य ती दिशा दाखविण्यासाठी ईश्वरीशक्तीला समाजातीलच एखाद्या घटकाच्या रुपात अवतार घ्यावा लागतो, समाजात राहून समाजाला घडवावे लागते. असे जरी असले तरी आपल्या कार्याच्या पूर्तीसाठी त्या शक्तीला आपल्यातील अलौकिक सामर्थ्याची प्रचिती द्यावी लागते. अशा अद्भुत सामर्थ्यासमोरच सर्व थरातील लोक नतमस्तक होतात, त्या शक्तीचे शब्द प्रमाण मानतात.

आपल्या साईबाबांनी वेगळा संप्रदाय किंवा अलग धर्म निर्माण केला नाही तर आपापल्या धर्मात राहून, आपापल्या दैवतांना मानून एकमेकांना सहाय्य करायला, एकमेकांशी प्रेमाने वागायला त्यांनी शिकविले. बाबांचे त्यांच्या मनुष्यदेहातील अवताराच्या वेळी कित्येकांना आलेले विलक्षण अनुभव याचसाठी होते, हे त्या अनुभवांचा सखोल विचार केला असता लक्षात येते. ते अतर्क्य अनुभव म्हणजे केवळ चमत्कार नव्हते, तर त्याद्वारे बाबांना बोध करावयाचा होता, विविध जातीधर्मांमध्ये विभागल्या गेलेल्या समाजाला एकत्र आणायचे होते, सेवाधर्माचे महत्त्व समजावून द्यायचे होते. याची ठळक उदाहरणे म्हणून दादासाहेब खापर्डे यांच्या मुलाचा ग्रंथीज्वर बाबांनी स्वतःवर ओढवून घेणे, हुंडीत अन्न शिजवून सहभोजन करविणे ह्या अनुभवांकडे पहाता येईल.

**दादासाहेब खापर्ड्यांचा। मुलगा एक लहान वयाचा। आनंद साईसहवासाचा। निजमातेच्या सहभोगी॥१०१॥ आधींचि तो मुलगा लहान। ताप आला फणफणून। मातेचें हृदय आलें उलून। अस्वस्थमन जाहली॥१०२॥ उमरावती वसतिस्थान। आलें मनीं करावें प्रस्थान। सायंकाळची वेळ साधून। आली आज्ञापन घ्यावया॥१०३॥ अस्तमानची करितां फेरी। बाबा येतां वाडियाशेजारीं। बाई जाऊनि पाय धरी। निवेदन करी घडलें जें॥१०४॥ आधींच स्त्रियांची जात घाबरी। तशांत मुलाची थांबेना शिरशिरी। ग्रंथिज्वराची भीतीही भारी। निवेदन करी घडलें तें॥१०५॥ बाबा म्हणती मृदु वचन। "आभाळ आलें आहे जाण। पडेल पाऊस पीक पिकोन। आभाळ वितळून जाईल॥१०६॥ भितां किमर्थ" ऐसें वदून। कफनी कंबरेपर्यंत उचलून। दाविते झाले सकळांलागून। ग्रंथी टवटवून उठलेल्या॥१०७॥ कुक्कुटीच्या अंड्यांएवढे। चार ग्रंथी चोहींकडे। म्हणती "पहा हें भोगणें पडे। तुमचें सांकडें मजलागीं"॥१०८॥ हें दिव्य आणि अलौकिक। कर्म पाहोनि विस्मित लोक। भक्तांलागीं दुःखेंही कैक। भोगिती अनेक संत कैशीं॥१०९॥ मेणाहूनि मऊ चित्त। सबाह्य जैसें नवनीत। लाभेंवीण भक्तांसी प्रीत। भक्तचि गणगोत जयाचें॥११०॥**

— अध्याय ७, श्री साईसत्चरित



**मशिदीचिया अंगणांत। चूल एक मोठी रचीत। वरी विस्तीर्ण पातेलें ठेवीत। पाणी तें नियमित घालुनी॥२५॥ कधीं 'मिठे चावल' करीत। कधीं पुलावा मांसमिश्रित। कधीं कणिकेचीं मुटकुळीं वळीत। वरान्नीं शिजवीत डाळीच्या॥२६॥ कधीं करूनि कणिकेचे रोडगे। अथवा थापूनि कणिकेचे पानगे। सोडीत शिजत्या वरणांत अंगें। मुटकुळ्यांसवें हळुवार॥२७॥ मसाला वाटूनि पाट्यावरती। स्वयें करीत पाकनिष्पत्ती। मुगवड्या करूनि स्वहस्तीं। हळूच सोडिती हंडींत॥२८॥ स्वर्गादि भुवनांचिया आशा। यज्ञार्थी करवूनियां पशुहिंसा। ब्राह्मणही सेविती पुरोडाशा। सशास्त्र हिंसा ही म्हणती॥२९॥ तैसेच मुल्लास आज्ञापून। करवूनि शास्त्रोक्त मंत्रोच्चारण। बाबाही करवीत अजाहनन। विधिविधानपुरःसर॥३०॥ कधीं मोठी कधीं लहान। हंडीचे या प्रकार दोन। तियेमाजीं शिजवूनि अन्न। करवीत भोजन अन्नार्थियां॥३१॥ पन्नास जणां पुरेसें अन्न। पुरवी जी ती हंडी लहान। जियेंत शंभर पात्रें जेवून। उरे जैं अन्न ती मोठी॥३२॥ तदर्थ आपण वाणियाकडे। स्वयें जाऊनि ठरवीत**

आंकडे। उधारीची वार्ता न तिकडे। पैसे ते रोकडे हातावरी ॥३३॥ मीठ, मिरची, जिरें, मिरें। भाजीपाला नारळ खोबरें। स्वयें बाबा आणीत सारें। पूर्ण विचारें ठरवून ॥३४॥ स्वयें बैसूनि मशिदीतें। जातें मांडूनियां निज हातें। गहूं डाळ जोंधळियातें। बाबांनीं तेथें दळावें ॥३५॥ हंडीप्रीत्यर्थ मुख्य परिश्रम। बाबाच आपण करीत अविश्रम। मसाला वांटावयाचेंही कर्म। करीत कीं परम मनोभावें ॥३६॥ करावया सौम्य वा प्रखर। चुल्लीमाजील वैश्वानर। इंधनें हीं स्वयें खालवर। करीत वरचेवर बाबा ॥३७॥ डाळ घालूनियां भिजत। स्वयें पाट्यावर वाटूं लागत। हिंग जिरें कोथिंबीर मिश्रित। खमंग बनवीत खाद्य स्वयें ॥३८॥ तिंबूनियां कणकीचे गोळे। करूनि सव्वा हात वेटोळें। लाटूनियां मग तें सगळें। करीत पोळे विस्तीर्ण ॥३९॥ जोंधळ्याचें पीठ आंत। पाणी घालूनि प्रमाणांत। करूनियां तें तक्रमिश्रित। आंबीलही करीत हंडींत ॥४०॥ तीही आंबील अवघियांतें। परमप्रेमें बाबा हातें। वाढीत इतर अन्नासमवेतें। अति आदरें ते समयीं ॥४१॥ असो हंडी शिजली पूर्ण। ऐसी नीट पारख करून। चुल्लीखालीं उतरून। मशिदीं नेऊन ठेवीत ॥४२॥ विधिपूर्वक मौलवीहस्तें। फात्या देववून त्या अन्नातें। प्रसाद पाठवीत म्हाळसापतीतें। आणीक तात्यांतें आरंभीं ॥४३॥ मग तें शेष सकळ अन्न। बाबा वाढीत निजहस्तेंकरून। गरीब दुबळे तृप्त करून। सुख समाधान पावत ॥४४॥ ते अन्नार्थी यावत्तृप्ति। अन्न सेविती उल्हासवृत्ती। वरी बाबा आग्रह करिती। घ्या घ्या म्हणती प्रीतीनें ॥४५॥ काय तयांचें पुण्य गहन। जयां हें लाधलें तृप्तिभोजन। स्वयें बाबा ज्यां ओगरिती अन्न। काय ते धन्य भाग्याचे ॥४६॥

–अध्याय ३८, श्री साईसत्‌चरित

बाबांच्या समाधीनंतर आजही त्यांचे अनुभव येत आहेत. परंतु त्या अनुभवांकडे केवळ चमत्कार म्हणून न पहाता त्याद्वारे बाबांना आपल्याला नेमके काय सांगावयाचे आहे यावर आपण चिंतन केले पाहिजे.

## दिलगिरी

'श्री साईलीला'चा मार्च-एप्रिल १९९१चा अंक काही तांत्रिक अडचणींमुळे पोस्ट करण्यास विलंब झाला. यामुळे पुढील १-२ अंक आपल्याला उशिरा मिळण्याची शक्यता आहे. वाचकांना होणाऱ्या गैरसोईबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

–संपादकीय विभाग

## 'श्री साईलीला' सभासदांना निवेदन

**'श्री साईलीला'ची वार्षिक वर्गणी रु. २५ असून आजीव सभासद वर्गणी रु. ५०० आहे. तरी जुन्या सभासदांनी व नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्यांनी कृपया याची नोंद घ्यावी.**

'श्री साईलीला'च्या आजीव सभासदांना मराठी किंवा इंग्रजी-हिंदी अंकांपैकी एकच अंक पाठविण्यात येईल. तरी आजीव सभासदांनी त्यांना वरीलपैकी कोणता अंक हवा आहे, ते अवश्य कळवावे.

'श्री साईलीला'संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना 'श्री साईलीला'च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या 'श्री साईलीला' सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.

'श्री साईलीला'च्या वेष्टनावर वर्गणी केव्हा संपत असल्याचा महिना व वर्ष नमूद केलेले असते, त्याप्रमाणे वर्गणी संपण्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर आपली वर्गणी भरावी.

पत्त्यात बदल झाल्यास मुंबई कार्यालयाला त्वरित कळवावे. पिनकोडसहित पूर्ण पत्ता लिहावा.

आपल्या पत्त्यात काही दुरुस्ती सुचवायची असल्यास, पत्ता अपूर्ण लिहिला जात असल्यास त्याविषयी त्वरित मुंबई कार्यालयाच्या निदर्शनास आणावे.

'श्री साईलीला'चे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी-कालावधी संपत असलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४-बी, खोदादाद सर्कलजवळ, दादर, मुंबई–४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो "श्री साईबाबा संस्थान, शिरडी" या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. मनिऑर्डर, पत्र मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेतच लिहावी. "संदेश के लिए स्थान" आणि "भेजनेवाले का नाम व पूरा पता" असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

मनिऑर्डर किंवा पत्रावर पत्ता लिहिताना वाचता येईल अशा स्पष्ट अक्षरांत लिहावा.

# भक्तांची अपार श्रद्धा व बाबांचे अलोट प्रेम

भारतभूमी ही पुण्यभूमी आहे. येथे अनेक संत होऊन गेले. त्यांनी समाजाची सेवा केली. समाजाला योग्य वळण लावले. माणुसकीचे धडे दिले. माणसा-माणसातील उच्च-नीच हा फरक नाहीसा व्हावा म्हणून प्रयत्न केले. जगाला मानवतेची शिकवण दिली. आपण सारी एकाच ईश्वराची लेकरे आहोत हे पटवून दिले.

ह्या संतांमध्ये श्री साईबाबा हे एक होत. त्यांनी श्रद्धा व सबुरी ह्या दोन गोष्टींवर जास्त भर दिला. ह्या दोन गोष्टींच्या जोरावर माणूस कोणत्याही मोठ्या संकटातून निभावून जाऊ शकतो हे दाखवून दिले.

साईबाबा जेव्हा शिरडीत आले तेव्हा सुरुवातीच्या काळात त्यांचे भक्त म्हणजे म्हाळसापती, बायजाबाई, काशिराम शिंपी, आप्पा भिल्ल, माधवराव देशपांडे इत्यादी होत. बाबांनी आपल्या भक्तांचे सदैव कल्याणच पाहिले. ज्यांच्या मनात, हृदयात एकदा बाबा शिरले तेथे त्यांना कायमचे स्थान मिळाले. बाबांकडे उच्च-नीच, श्रीमंत-गरीब असा भेद मुळीच नव्हता. त्यामुळे प्रत्येक भक्ताला बाबा आपलेच वाटत. बाबासुद्धा आपल्या भक्तांची काळजी वाहत. त्यांना वेळोवेळी संकटांतून, अडचणींतून सोडवित. पुढे घडणाऱ्या गोष्टींची सूचना देऊन मार्गदर्शन करीत. काही वेळा भक्तांची परीक्षाही घेत. त्यांची कसोटी पाहत. त्यापैकीच खालील एक प्रसंग.

> **हां हां काका होय परता। काय रे तुझी हे निष्ठुरता।**
> **ब्राह्मण होऊनि हिंसा करितां।**
> **विचार चित्ता नाहीं का''॥**
> **ऐसें परिसतां टाकिला सुरा। आश्चर्य वाटलें लहानथोरां।**
> **जीवदान लाधला बकरा। गुरुभक्ति शिखरा चढविली॥**
> **मग काका सुरा टाकोन। काय वदती द्या अवधान।**
> **''बाबा आपुलें अमृतवचन। धर्मशासन तें आम्हां॥**
> **आम्हीं नेणूं दुजा धर्म। आम्हां नाहीं लाज शरम।**
> **गुरुवचनपालन हेंच वर्म। हाचि आगम आम्हांतें॥**
> **गुर्वाज्ञापरिपालन। हेंचि शिष्याचें शिष्यपण।**
> **हेंचि आम्हां निजभूषण। अवज्ञा दूषण सर्वार्थी॥**
> **होऊं सुखी अथवा कष्टी। परिणामावर नाहीं दृष्टी।**
> **घडेल असेल जैसें अदृष्टीं। परमेष्ठीला काळजी॥**
> **आम्हां तों एकचि ठावें। आपुलें नाम नित्य आठवावें।**
> **स्वरूप नयनीं सांठवावें। आज्ञांकित व्हावें अहर्निशीं॥**
> **हिंसा अहिंसा आम्ही नेणूं। आम्हांसी तारक सद्गुरुचरणू।**
> **आज्ञा किमर्थ हें मनीं नाणूं। प्रतिपालनु कर्तव्य॥**
> **गुर्वाज्ञा जेथ स्पष्ट। युक्तायुक्त वा इष्टानिष्ट।**
> **हें विचारी तो शिष्य नष्ट। सेवाभ्रष्ट मी समजें॥**
> **गुर्वाज्ञेचें उल्लंघन। तेंच जीवाचें अधःपतन।**
> **गुर्वाज्ञा-परिपालन। मुख्य धर्माचरण हें॥**
> **चित्त गुरुपदीं सावधान। राहोत कीं जावोत प्राण।**
> **आम्हां गुरूचीच आज्ञा प्रमाण।**
> **परिणाम निर्वाण तो जाणे॥**

–ओवी १६८ ते १७८,
अध्याय २३, श्री साईसत्चरित

एके दिवशी एक आसन्नमरण बोकड कोणीतरी मशिदीत आणला. त्यावेळेस बाबांकडे बडेबाबा बसले होते. त्यांना बाबांनी त्या बोकडास मारण्यास सांगितले. बडेबाबा म्हणाले, "कैसा बे काटना इसकू खाली!" हे ऐकून बाबांनी माधवराव देशपांड्यांना, "श्यामा, तू तरी सुरी आण. आपण बोकडास कापू" असे सांगितले. माधवरावांनी सुरी आणून बाबांसमोर ठेवली. बाबांनी सुरी मागविण्याचे कारण कळताच राधाकृष्णमाईंनी ती परत मागवून घेतली. बाबांनी त्यानंतर काकासाहेब दिक्षितांना सांगितले, "जा, हा बकरा मारण्यासाठी तू सुरी घेऊन ये आणि त्याला मुक्त कर". बाबांची आज्ञा मानून काकासाहेबांनी साठेवाड्यातून सुरी आणली. "हूं, मार आतां काय बघशी" असे बाबांनी म्हणताच काकांनी बोकडावर वार करण्यासाठी हात वर उगारला, तेवढ्यात बाबा म्हणाले, "राहू दे काका, पाठीमागे हो. किती रे तुझी निष्ठुरता. ब्राह्मण असून हिंसा करतोस?"

वर दिलेल्या १६८ ते १७८ ओव्यांत काकांचे मनोगत दिसून येते. बाबांवर त्यांची अपार, अढळ श्रद्धा. बाबांची जी आज्ञा ती मान्य. त्यातून काही वाईट अमंगल घडणार नाही याची पुरेपूर खात्री. बाबा जे काही करतील ते चांगलेच असेल असा दांडगा विश्वास. मग बाबांनी बोकड मारावयास सांगितले ना मग बोकड मारायचा. बाबा काय ते पाहून घेतील. साईमाऊली लेकराच्या भल्यासाठी बसली असताना भय ते कसले. त्यातून बरेवाईट घडले तर त्याची काळजी बाबांना. काकासाहेबांना एवढेच माहीत होते की ती बाबांची आज्ञा आहे, ती गुरुआज्ञा आहे व तिचे आपण पालन करायला हवे. त्यातून हिंसा होवो अथवा अहिंसा जे काम इतर कोणी करू शकला नाही ते काकासाहेब ब्राह्मण असून करावयास तयार झाले. यात दिसून येते ती काकासाहेबांची आपल्या गुरूवर–बाबांवर असलेली

अढळ श्रद्धा, अपार भक्तिप्रेम आणि अढळ निष्ठा. बाबांनीसुद्धा हा प्रसंग घडवून आणून इतरांना श्रद्धा व निष्ठा कशी असावी हे सोदाहरण दाखवून दिले.

**आसन्नप्रसव नानांची दुहिता।**
**असह्य चालल्या प्रसूतिव्यथा॥**
**जामनेराहून साईसमर्थां। हांका सर्वथा मारिती॥**
**जामनेरींची ही स्थिती। शिरडीस कोणास ठावी नव्हती।**
**बाबा सर्वज्ञ सर्वगती। कांहीं न जगतीं अज्ञात त्यां॥**
**बाबांसीं भक्तांची एकात्मता।**
**जाणून नानांचे एथील अवस्था।**
**समर्थ साई द्रवले चित्ता। करिती तत्त्वतां तें काय॥**
**उदी धाडावी आलें जीवा।**
**इतुक्यांत गोसावी रामगीरबुवा।**
**जाहला तयाच्या मनाचा उठावा।**
**आपुले गांवा गमनार्थी॥**
**गांव तयांचा खानदेशीं। निघाला सर्व तयारीनिशीं।**
**पातला बाबांचे पायांपाशीं। दर्शनासी मशीदीं॥**

ओवी ६५ ते ६९, अध्याय ३३,
श्री साईसत्‌चरित

बाबा द्वारकामाईत राहून सर्व काही जाणत. आपल्या प्रत्येक भक्ताची त्यांना काळजी असे. नानांनी मदतीसाठी बाबांना मारलेली आर्त हाक बाबांना ऐकू आली होती. नानांच्या घरची अवस्था त्यांना पूर्ण माहीत होती. गोसावी रामगीरबुवा खानदेशी आपल्या गावी जायला निघाले. बाबांची अनुज्ञा घ्यायला ज्यावेळी रामगीरबुवा बाबांच्याजवळ गेले त्यावेळी बाबा त्यांना म्हणाले, "पहिल्यांदा जामनेरला नानांच्या घरी जा." उदीची पुडी व अडकरांची 'आरती साईबाबा। सौख्यदातारा जीवा' ही आरती माधवराव देशपांड्यांकडून लिहून घेऊन ती जामनेरला नानांना द्यायला दिली.

बापूगीर बाबांना म्हणाले, "माझ्यापाशी अवघे दोनच रुपये आहेत. एवढ्या पैशात मी जामनेरला कसा पोचेन?"

बाबा वदती, **"तूं स्वस्थ जाईं। लागेल तुझी सर्व सोयी"। विश्वास ठेवूनि साईंचे पायीं। निघाले गोसावी जावया।** आताच्या सारखी त्यावेळी जामनेरला जायला रेल्वेगाडी नव्हती. जळगाव मुक्कामी रेल्वेने जाऊन तिथून पायीच जामनेरला जाण्याचे गोसावींच्या मनात आले. जळगावपर्यंतच्या प्रवासाला एक रुपया चौदा आणे खर्ची पडले व दोन रुपयांतून फक्त दोन आणे म्हणजे चवलीच शिल्लक राहिली.

तिकीट देऊन स्टेशनच्या बाहेर पडताच त्यांचीच विचारपूस करीत एक शिपाई आला. चांदोरकरांनी तुम्हाला घेण्यासाठी टांगा पाठविला आहे तर तुम्ही चला असे म्हणाला. पहाटेला ओढ्यापाशी आल्यावर टांगेवाला म्हणाला, "चला, आपण आंबापेढे खाऊया." बुवांच्या मनात टांगेवाल्याच्या पेहरावावरून तो यवन असावा असे वाटत होते. टांगेवाला म्हणाला,

**म्हणे तूं कां झालासी शंकित। मी हिंदू गरवाल क्षत्रियपूत। असें मी रजपूत जातीचा॥**

हे ऐकून गोसावी फराळ खायला तयार झाले. दोघांनीही फराळ खाल्ला. अरुणोदय होताच टांग्याने दोघेही गावात आले. नानांची कचेरी दिसायला लागली. बुवांना लघुशंका झाली म्हणून ते बाजूला बसायला गेले व काही वेळाने पूर्वस्थळी येताच टांगा नाही, घोडी नाहीत व टांगेवालाही नाही अशी स्थिती पाहून रामगीर गोसावींना आश्चर्य वाटले. त्यानंतर लोकांना विचारत ते नानांच्या घरी आले. उदी व आरती दिली. सर्व वार्ता निवेदन केली. उदी लावल्यावर नानांची मुलगी प्रसूत झाली. कसलाही त्रास झाला नाही. रामगीर गोसावींनी नानांना विचारले, "तुम्ही पाठविलेला टांगा इथे आल्यावर मला दिसला नाही." नाना म्हणाले,

**नाना वदती म्यां न धाडिला।**
**तांगा कुठला ठावा न मजला।**
**तुम्ही येतां हें ठावें कुणाला।**
**तांगा कशाला धाडीन मी॥**

मग बुवांनी टांग्याची कथा आमुलाग्र नानांस सांगितली.

**विस्मय दाटला नानांचे चित्ता।**
**पाहूनि वत्सलता बाबांची॥**
**कुठला तांगा, कुठला शिपाई।**
**नट नाटकी ही माउली साई।**
**संकटसमयीं धांवत येई। भावापायीं भक्तांच्या॥**

बाबा सर्वज्ञ होते. आपले भक्त कुठेही असले तरी त्यांच्या संकटकाळी ते धावून येत. भक्तांची संकटातून सुटका करण्यासाठी ते सर्व व्यवस्था करीत. भक्तांचाही बाबांवर अपार विश्वास. खिशात दोन रुपये असताना रामगीर गोसावी एवढ्या लांब ठिकाणी जायला निघाले ते केवळ बाबांच्या आश्वासनावर.

बाबांनी श्रद्धा व सबुरी ह्या दोन महत्त्वाच्या तत्त्वांची शिकवण अनेक प्रसंगांतून दिली आहे. त्यासाठी त्यांनी केलेले नाटक वरील प्रसंगातून दिसून येते. त्यांच्यावर श्रद्धा ठेवून त्यांना आर्ततेने हाक मारणाऱ्या भक्तांचे ते पाठीराखे आहेत. आजही ते भक्तांच्या मागे उभे आहेत. त्यांच्या हाकेला धावून जात आहेत. संकटातून मुक्त करीत आहेत. याची साक्ष देणाऱ्या कैक घटना त्याकाळी व आजही घडत आहेत.

**–सौ. प्रविणा कांबळी**
मानद सहाय्यक कार्यकारी संपादिका

# श्री साईंचे सत्य चरित्र–अध्याय १३वा

**सटीक गद्य अनुवाद:**
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

**"भीमाजी क्षय निवारणं"**

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरू महाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्गुरू साईनाथांना नमस्कार असो.

श्री साईबाबांचे बोल (बोललेले शब्द) एका वाक्यात संक्षिप्तपणे व्यक्त केलेले (सूत्रमय) अति लहान असत, परंतु अर्थाच्या भारदस्तपणामुळे (गांभीर्ये) समजण्यास कठीण (गहन) असत. विशालतेने (व्यापकत्वे) फार अघळपघळ (विस्तीर्ण) असत, पण एकवटलेले (संकीर्ण) सुद्धा तेवढेच असत. असे हे बाबांचे बोल अर्थाच्या तात्पर्याने (अर्थे-तत्त्वें) अति गंभीर (सखोल) असत. कधीही (कल्प+अंतीहीं) निरर्थक किंवा पोकळ बडबडीचे (फोल) नसत, तर सौम्य किंवा शांत (समतोल) आणि अत्यंत मोलाचे (अनमोल) असत. पहिल्यापासून शेवटपर्यंत (पूर्व+अपर) एक संगतीने (अनुसंधान) राहावे, दैवाने जे प्राप्त होईल त्याला अनुसरून वागणारे (यथा+प्राप्त+अनुवर्ती) व्हावे, सदा संतुष्ट (तृप्त) असावे (पहा गीता, अ. ४, श्लो. २२ **यदृच्छा लाभ संतुष्टो**) आणि केव्हाही (कदापि) सचिंत (काळजी करत) नसावे. "अरे मी घरा-दाराशिवाय फकीर झालेलो आहे. बेफिकीर होऊन, सर्व कटकट (किरकिर) टाकून एका ठिकाणी स्वस्थ बसलो आहे, तरी ती टाळता न येणारी (अनिवार) माया (मोह घालणारी ईश्वराची शक्ती) मलासुद्धा सतावते (गांजते). मी तिला विसरतो, पण ती मला विसरत नाही. मला ती सतत बिलगते (निरंतर कवटाळी). हरीची (ईश्वराची) ती आदिमायाच (प्रपंचाला कारणीभूत मूळ प्रकृती) आहे. ब्रह्मदेव वगैरेंचीसुद्धा ती तारांबळ (त्रेधा) उडविते, तेथे माझ्यासारख्या दुबळ्या (लाचार) फकिराची काय कथा! हरीच जेव्हा प्रसन्न होईल तेव्हाच तिचे गांजणे बंद पडेल (होईल ते विच्छिन्न). हरीचे अखंड (अविच्छिन्न) भजन केल्याशिवाय मायेचे निवारण होणे शक्य नसते." असे हे मायेचे महिमान बाबा भक्तांना सांगत असत आणि हरीच्या सेवापूजेने तिची शांती (निवृत्ती) होण्यासाठी सदा भजन करण्याच्या स्थितीची प्रशंसा करीत असत (वानिती). (ओ. १-८)

"संत माझ्या सचेतन (सजीव) मूर्ती आहेत," असे श्रीकृष्ण भगवानांनी भागवतात उद्धवाला स्पष्ट म्हटलेले शब्द (स्पष्ट+उक्ति) कोणाला ठाऊक नाही! (पहा मागील अ. ११, ओ. ३० आणि एकनाथी भागवत, अ. ११, ओ. १२०) म्हणून भक्तांच्या कल्याणासाठी दयेचे सागर साईसमर्थ सत्य आणि अर्थयुक्त जे बोलले ते अति नम्र होऊन ऐका. "ज्यांची पापे धुवून निघाली आहेत तेच खरे (वहिले) पुण्यात्मे माझ्या भजनी लागले व त्यांनाच माझा पत्ता लागला (खूण लागली माझी). 'साई साई' असे नित्य म्हणाल तर मी साता समुद्रापलीकडेही लक्ष ठेवून तुमचे काळजीपूर्वक रक्षण करीन (सात समुद्र करीन न्याहाल). या (माझ्या) शब्दांवर विश्वास ठेवाल तर खात्रीने तुमचे कल्याण होईल. मला पूजेची (महागडी) सामग्री (संभार) नको किंवा आठ किंवा सोळा प्रकारचे पूजेचे उपचार (विधी) नकोत, जेथे अमर्याद (अपरंपार) भक्तिभाव असेल त्याठिकाणी माझी वस्ती (थार) असेल," असे बाबा भक्तांच्या प्रेमामुळे वेळोवेळी बोलून गेले. त्या प्रेमळ शब्दांची आता आठवण करून मनाला रमवू या (विरंगुळा करू या). असा हा दयाळू व शरण आलेल्यांचा पाठिराखा साईसखा आहे. भक्तांचा चांगला (निका) कैवार घेऊन त्याने काय नवल केले पहा! मनाचे अनेक ठिकाणी असलेले लक्ष (अनेकाग्रता) घालवून त्याला एकाग्र करून ही नवी कथा समूळ (साग्रता) ऐकावी म्हणजे आपले काम पुरे केल्यासारखे (कृत+कार्यता) होईल (सिद्धीस जाईल). साईमुखीची जी अमृतवृष्टी तीच येथे पुष्टि (संतोष समाधान) आणि तुष्टि (भरभराट प्रगती) असते. आपले हित करून घेण्याचे जर मनात असेल (निज+हित+दृष्टि ठेवल्या) तर शिरडीला येण्याच्या दगदगीला (कष्टीं) कोण बरे कंटाळेल! (ओ. ९-१७)

मागील अध्यायाची संगती अशी आहे. एका अग्निहोत्र्याला त्याच्या ब्रह्मीभूत झालेल्या गुरूचे दर्शन देऊन बाबांनी आनंदित केले होते. आता हा अध्याय त्याहीपेक्षा गोड आहे. एका क्षयी आणि रोड (बारीक वाळलेल्या) भक्ताची स्वप्नात खोड मोडून (शिक्षा करून) बाबांनी त्याला आरोग्याची जोड (लाभ) दिली. तरी भाविक जन हो! साईनाथांचे पापांचा नाश करणारे (कल्मष+दहन+काटक) व गूढ चरित्र नीट लक्ष देऊन ऐका. हे चरित्र स्वतःच्या पुण्याईने इतरांना पवित्र करणारे (पुण्य+पावन) आहे. जणूकाय गंगानदीचे पवित्र जलच (पाणीच). या लोकांचे व परलोकांचे हित साधणारे हे चरित्र ऐकणाऱ्या श्रोत्यांचे कान धन्य आहेत. या चरित्राला अमृताची (देवांचे पेय) उपमा देऊ पहावे तर अमृत काय या चरित्रापेक्षा जास्त गोड आहे! अमृत प्राणांचे रक्षण करील (मरणापासून वाचवील) परंतु हे चरित्र तर (पुन्हा पुन्हा) जन्म घेण्यापासून सोडवील. (ओ. १८-२२)

जे प्राणी आपणाला संपूर्ण अधिकार असलेले (सत्ताधीश)

मानत असतील व ज्यांच्या मनाला आपल्या इच्छेस येईल तसे आपण करू शकू असे वाटत असेल, त्यांनी हे कथानक ऐकावे. जीव (जिवंत प्राणी) जर खरोखरीच स्वतंत्र आहे (असे म्हणावे) तर मग सुखासाठी रात्रंदिवस (अहोरात्र) कष्ट करूनही त्याच्या पदरी दुःखच का बरे पडते? हा तर नशीबाचा खेळ आहे. (चरित्र सत्तेचे) दुःखे टाळण्यासाठी जागोजागी सावधान असूनही ती अतिशय तत्परतेने (लागवेगी) त्याचाच शोध घेऊन मागे लागतात (धुंडीत मागी घेतात), चुकवू (वारू) जाता गळ्यात पडतात, झटकू जाता आणखीच चिकटतात (लिपटती). जीवाची ही फुकट (वावगी) धडपड असते व अहोरात्र असे अतिश्रमाने थकून जाणे (शीण) असते. जीव जर खराच स्वतंत्र (स्व+वश) असता तर पूर्णपणे सुखाच्या आधीन असता आणि दुःखाच्या एका कणालाही (लवलेश) जरासुद्धा (रेसभरही) न शिवता (नातळता) स्वतंत्र बुद्धी असल्याने पाप करण्यासारखे कधी वागला नसता; पुण्यच खूप गोळा केले असते (समृद्धि) आणि सुखाचीच वाढ करवून घेतली असती. परंतु जीव स्वतंत्र नसतो. त्याच्या पाठीशी कर्मतंत्र (कर्म+आधीनता=कर्माप्रमाणे म्हणजे पूर्वीच्या कृती किंवा आचरण यांच्या ठरलेल्या परिणामाप्रमाणे वागण्याची सक्ती) असते. त्या तंत्राचा खेळच विचित्र असतो. सर्व कर्म करण्याचे साधन (कळसूत्र) त्या तंत्राच्या हाती असते. पुण्यकर्म करण्याकडे लक्ष जाते, परंतु पाय पापकर्म करण्याकडे ओढले जातात. चांगल्या कर्मांचा ठिकाणा शोधू जाता वाईट कर्मांशीच शरीराची भेट होते (कुकर्मीच काय आतुडे). (ओ. २३-३०)

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील नारायण गावच्या भीमाजी पाटलाची कथा आता ऐका. जणूकाय ती मूर्तिमंत अमृताची गोडीच (रसराजीच) आहे. भीमाजी घरचा सुखसंपन्न होता. आल्यागेल्यांना अन्न वाटत असे. त्याचे मन कदापि खिन्न नसायचे व तो सदा हसतमुख (प्रसन्न+वदन) असावयाचा. दैवाची तरतूद (संजोग) विलक्षण असते. लाभ किंवा हानी (वियोग) न कळता होतात, कर्माचे भोग चालून येतात आणि नसते रोग शरीरात उत्पन्न होतात. इ.स. १९०९ साली भीमाजीला कमनशीब (दुर्दैव) पीडा देऊ लागले. खोकल्याचा क्षयरोग झाला आणि ताप येऊ लागला (प्रादुर्भाव ज्वराचा). सहन होऊ न शकणारा (असेय) खोकला येऊ लागला, तापही फार वाढू लागला. दिवसेंदिवस जोराने वाढतच (बळावत) गेला आणि भीमाजी निराश झाला. तोंडाला सदा फेस येणे, पूर्णपणे खारटही नाही आणि गोडही नाही अशा पाण्याच्या (मचूळ) आणि रक्ताच्या गुळण्या येणे, पोटात सारखे (अक्षयी) ढवळून येणे (कळमळणे) आणि जीव तळमळणे थांबत नव्हते. असा रोगाने पछाडलेला (दुखणाईत) तो भीमाजी बिछान्याला (शेजे) खिळला. त्याचे हातपाय (गात्रें) गळून गेले आणि तो वाळत चालला. सगळ्या उपायांची शिकस्त झाली (तरी बरे वाटेना) म्हणून तो फार त्रासून गेला. अन्नपान काही आवडत नव्हते, कांजीसारखे आजारी माणसांचे खाद्यही (पेजपथ्य) पचत नव्हते. त्यामुळे जीवाचे हाल असह्य होऊन भीमाजी अस्वस्थ झाला व त्याला काही सुचेना. देवांची सारी पूजा-अर्चा व सेवा (देव+देवस्की) झाली, वैद्य डॉक्टरांनी हात टेकले, बिचाऱ्या भीमाजीने जगण्याच्या आशेवर पाणी सोडले आणि तो काळजीत (विचारी) पडला. पाटील मनात खिन्न (उद्विग्न) झाले. थोड्या दिवसांचे सोबती वाटू लागले. दिवसेंदिवस उत्तरोत्तर फारच थकले आणि दिवस कसेबसे काढू लागले (दिवसगति लागले). कुलदेवता आराधिली, पण तीही आरोग्यता देईना. ज्योतिषी (जोशी), भूत-पिशाच्च काढणारे मांत्रिक (पंचाक्षरी) यांना विचारविचारून पाटील थकले. कोणी म्हणत, "कसला हा शरीराचा (अंग) रोग! काय तरी हा नशीबाचा योग! वाटते पुरा भोगच कोसळला. मनुष्याचा प्रयत्न काही कामाचा नाही." डॉक्टर झाले, हकीम (मुसलमानी वैद्यकी म्हणजे युनानी जाणणारे वैद्य) झाले, उपचार करता करता सर्व थकून गेले. कोणाचे काहीच चालेना आणि सगळ्यांचे प्रयत्न हरले. पाटील अत्यंत त्रासून गेले (कदरले) व म्हणाले, "देवा! मी काय केले? काहीच का उपयोगाला येत नाही? कसले हे पाप तरी?" देव तरी कसा हा विलक्षण आहे! जो सुखात लोळत असतो त्याला आपले स्मरण एक क्षणही होऊ देत नाही. खरेच त्याची लीला आश्चर्यकारक आहे (नवल विंदान तयाचे). मग जेव्हा त्याच्याच (देवाच्याच) मनात येईल तेव्हा नाना प्रकारच्या संकटांची परंपरा धाडतो आणि आपले स्मरण करवून भक्तांकडून "नारायणा धाव" असे म्हणवून घेतो. (ओ. ३१-४६)

असो. दुःखाने व्याकूळ झालेल्या भीमाजीचा (कळवळ्याचा) धावा ऐकून देवाला तात्काळ प्रेम दाटून आले आणि भीमाजीला बुद्धी झाली की (आपले अधिकारी स्नेही व साईबाबांचे श्रेष्ठ भक्त) नानासाहेब चांदोरकर यांना पत्र धाडावे. नानासाहेब काहीतरी करतील जे इतर कोणालाही करता येणार नाही असा पूर्ण विश्वास पाटलांना वाटला. हाच त्यांचा शुभ शकुन होता (भविष्यसूचक चिन्ह होते). हेच रोगाच्या बरे होण्याला कारण होते. पुढे त्यांनी नानासाहेबांना सविस्तर पत्र लिहून पाठविले. भीमाजींना नानासाहेबांची आठवण झाली म्हणजेच साईबाबांची एकदम आठवण (स्फुरण) झाली आणि रोग बरा होण्याचे साधन (कारण) उत्पन्न झाले (उद्भवले). संतांचे कौशल्य (विंदान) अतर्क्य असते. (कोणतीही गोष्ट घडून येण्यास) कालचक्राची (दैवाच्या फेऱ्याची) रचना (करणी) असली तरी तेथेही ईश्वराचीच योजना असते. म्हणून कोणी दुसरीच काही (अन्यथा) कल्पना करून उगाच बढाई मारू नये (वल्गना न करावी). बऱ्या वाईट क्रियांचा सूत्रधार (चालक) ईश्वरच असतो. तोच मारतो

किंवा वाचवितो (तारी किंवा मारी). (सर्व) कार्ये करणारा तोच एक आहे. पाटलांनी चांदोरकरांना लिहिले, "औषधे खाऊन खाऊन त्रासलो. जिवंत राहण्याला कंटाळलो (कदरलो), जग उदास वाटते. डॉक्टरांनी आशा सोडली आणि दुखणे (व्याधी) बरे होण्यासारखे नाही (असाध्य) असे ठरविले आहे. हकीम व वैद्य यांचीसुद्धा बुद्धी थकली आहे आणि माझीदेखील आशा खुंटली आहे (उमेद खचली). तरी आता आपल्या पायी एकच विनंती आहे की मला आपली भेट जरूर होऊ द्यावी, हीच माझ्या मनाची आकांक्षा (असोसी) आहे." चांदोरकरांनी पत्र वाचले. त्यांचेही मन खिन्न झाले. भीमाजी मोठे भले गृहस्थ होते (हे माहीत असल्याने) म्हणून नानांच्या मनाला पाझर फुटला (द्रवले). त्यांनी उत्तर पाठविले, "साईबाबांचे पाय धरणे हाच फक्त एक इलाज किंवा बरे होण्याचे साधन (तरण+उपाय) आहे. बाप व माय तेच आहेत. तीच सर्वांची कनवाळू आई आहे. हाकेसरशी धावून येईल आणि कळवळून कडेवर घेईल. लेकरांची सोय (ज्यात समाधान लाभेल ती स्थिती) तिलाच ठाऊक असते. क्षयरोगाची काय कथा! दर्शनाने महारोगसुद्धा बरे होतात! शंका मुळीच धरू नका. जा, घट्ट त्यांचे पाय धरा. भक्त जे जे मागतील ते ते त्यांना द्यावयाचे साईबाबांनी व्रत घेतलेले आहे (ब्रीद जयाने बांधिले पायीं). म्हणून म्हणतो घाई करा आणि त्यांचे दर्शन घ्या. भीतीत मोठी भीती मरणासारखी दुसरी कोणती असते का! जा, साईंचे पाय घट्ट धरा. ते एकच तुम्हाला निर्भय करतील (मरणाच्या भीतीपासून सोडवतील). (ओ. ४७-६१)

इकडे भीमाजींना आपले दुखणे (व्यथा) असह्य झाले होते व आयुष्याची अखेरची स्थिती (प्राण+अंतिक+अवस्था) येऊन ठेपली होती. (नानांचे पत्र वाचून) साईबाबांना कधी भेटेन व कधी आपले काम साधून घेईन असे पाटलांना झाले. ते अगदी भांबावून गेले व म्हणू लागले, "सरसामान सर्व आवरा. उद्याच निघण्याची तयारी करा आणि शिरडीचा रस्ता धरा." अशा प्रकारे पक्का निश्चय करून सगळ्यांचा निरोप घेऊन पाटील साईमहाराजांचे दर्शन घेण्याकरिता शिरडीला निघाले. बरोबर नातलग घेऊन भीमाजी चटकन निघाले. मनात फार उत्सुकता होती की शिरडी मला कशी लवकर दिसेल? मशिदीच्या चौकाशेजारी पुढच्या दारात गाडी आली आणि चौघांनी उचलून भीमाजींना मशिदीत वर आणले. नानासाहेब बरोबर होतेच. माधवराव, ज्यांच्यामुळे साईबाबांचे चरणकमळ मिळविणे सगळ्यांना सोपे होत असे, तेही तेथे आले. पाटलांना पाहून बाबा म्हणाले, "शामा! हे चोर आणून किती माझ्या अंगावर घालतोस! हे बरे का करतोस!" भीमाजींनी साईंच्या पायांवर मस्तक ठेवले आणि म्हणाले, "हे साईनाथा! या अनाथावर कृपा करा. हे दीनानाथा! मला सांभाळा." पाटलांची व्यथा पाहून साईनाथांना दया उपजली आणि त्याबरोबरच पाटलांचा विश्वास बसला की आपली दुःखाची परिस्थिती आता संपली. (ओ. ६२-७०)

भीमाजी पाटील असे अस्वस्थ (प्रकृतीस व मनास समाधान नसलेले) पाहून कृपेचे सागर साई समर्थ मनात अत्यंत द्रवले (हेलावला अपरिमित) आणि हसून (सस्मित) म्हणाले, "आता येथे बैस. चिंता (खंत) सोडून दे. विचारी माणसे उगीचच मनःस्ताप करून दुःखी होत नसतात. शिरडीत पाय टाकल्याबरोबरच तुझ्या भोगांचा अंत झाला आहे. संकटांच्या सागरात (संकट+अर्णवीं) गळ्यापर्यंत (आ+कंठ) बुडाला असला किंवा महान दुःखाच्या खड्ड्यात गाडला गेला असला (महा+दुःख+गर्तेत गढला) तरी जो या मशीदमाईची पायरी चढला असेल तो सुखी झाला (सुखा आरूढला) असे समजावे. येथील फकीर (या बाबांच्या शब्दाबद्दल मागील अ. ११ तील ओ. ९६ वरील विवेचन पहा) मोठा दयाळू आहे आणि तुझ्या व्यथा तो मूळापासून उपटून काढेल. तो मोठा कनवाळू आहे आणि प्रेमाने तुझा प्रतिपाळ (संभाळ) करेल. यासाठी तू स्वस्थ राहा. भीमाबाईच्या (शिरडीत राहणारी बाबांची एक निःस्सीम भक्तीण. तिला आपल्या घरी रोग्यांना राहण्यासाठी जागा देण्यास बाबा सांगत असत. पहा मूळ पोथीतील अ. ७, ओ. ९९ वरील टीप १) घरी (सदनीं) राहा. एक दोन दिवसात तुला आराम वाटेल." साईबाबांच्या तोंडचे हे शब्द ऐकून जसे एखाद्या मेलेल्या माणसावर (आयुष्यहीन) अमृताचा वर्षाव (सिंचन) होऊन तात्काळ त्याला पुन्हा जीवदान (पुनर्+उज्जीवन) लाभावे तसे समाधान पाटलांना लाभले. असे मरणाच्या दारी गेलेल्याला (मरण+उन्मुख) अमृत किंवा तहानेने तहानेल्याला पाणी (जीवन) मिळावे तसे समाधान पाटलांना लाभले. आधी प्रत्येक पाच मिनिटाला तोंडातून रक्ताच्या गुळण्या येत असत. परंतु बाबांच्या समोर एक तास बसल्यावर त्या नाहीशा झाल्या (निरास पावल्या). दुखणे तपासून पाहिले नाही, रोग कशाने झाला याचे कारण विचारले नाही, केवळ कृपादृष्टीने रोग तात्काळ मूळासकट उपटून काढला (रोगोन्मूलन). संतांची कृपादृष्टीच पुरेशी असते. वाळलेल्या लाकडाला (काष्ठा) कोंब किंवा अंकूर (कोंभरे) फुटतील, वसंत ऋतू नसला तरी फुलांचे झुबके (तुरें) फुलतील आणि मग ते (लाकूड) मनोहर (रमणीय) फळांनी गच्च भरून जातील (डवरतील). रोग काय आरोग्य काय, पुण्याचा व पापाचा नाश (क्षय) झाल्याशिवाय किंवा ज्याने त्याने भोगल्याशिवाय ते सुटत नाही. इतर उपाय चालत नसतात. केवळ भोगूनच त्यांचा नाश होतो. हीच जन्मजन्मांतरी (पूर्वीपासून झालेल्या सर्व जन्मांमध्ये आणि ह्या जन्मात) खात्रीने होणारी गोष्ट (निश्चय) आहे. भोगल्याशिवाय दुसऱ्या उपायाने त्यांची निवृत्ती होत नसते. तथापि दैववशाने एखाद्या संताचे दर्शन घडणे हे एक व्याधीसाठी दुःखहारक औषध (उपशमन) असते. मग रोगाने ग्रस्त झालेला

इसम आपल्या रोगाचे दुखणे यातनेशिवाय सहन करतो. रोग कठोर पीडा किंवा क्लेश यांचा अनुभव दाखवितो तर संत करुण दृष्टी ठेवून त्या रोगाच्या भोगाचे निवारण त्या दुःखाची जाणीव न होऊ देता करतो. बाबांचा केवळ शब्द हेच खात्री पटेल असे कारण (प्रमाण) असते. तेच हटकून गुण देणारे (रामबाण. रामाने सोडलेला बाण कधीही व्यर्थ जात नाही यावरून) औषध असते. एकदा काळ्या कुत्र्याने दहीभात खाल्ला आणि (एका भक्ताचा) हिमज्वर (मलेरिया) बरा झाला. कथेमध्ये या आडकथा वाटतील, परंतु ह्या सारांश रूपाने (संकलित) ऐकल्या तर त्याची उचितता (समर्पकता) दिसून येईल. असो. आठवण करून देणाराही साईच आहे. "माझी कथा मीच करीन" असे साईच बोलून गेले आहेत. त्यांनीच यावेळी या कथांची मला आठवण करून दिली आहे. (ओ. ७१-८७)

बाळा गणपत नावाचा शिंपी (कपडे शिवणाऱ्या) जातीचा एक बाबांचा मोठा भाविक भक्त होता. तो एकदा बाबांपुढे अतिशय केविलवाणे तोंड करून (दीन+मुख) विनंती करू लागला, "बाबा! कोणते मी असे पाप केले की हा हिवताप (थंडीचा ताप. मलेरिया) मला सोडत नाही? पुष्कळ (अमूप) उपाय झाले, परंतु हा अंगातून निघत नाही. तर मी आता काय करू? वनस्पतींचे अर्क किंवा काढे (कषाय) वगैरे सर्व औषधेही झाली. आता तुम्ही तरी काही उपाय सांगा जेणेकरून हा ताप निघून जाईल." तेव्हा (तंव) बाबांच्या मनात दया उपजली व त्यांनी उत्तर दिले, "दहीभाताचे काही घास (कवळ) लक्ष्मी देवीच्या देवळाजवळ (हे देऊळ शिरडीत समाधिमंदिराच्या ईशान्य दिशेला 'शांतिनिवास'च्या मागून जाणाऱ्या रस्त्यावर हॉटेल साई पॅलेस समोर आहे.) काळ्या कुत्र्याला खाऊ घाल म्हणजे लगेच बरा होशील." बाळा भीतभीतच गेला आणि घरी जाऊन पाहू लागला, तर तेथे झाकून ठेवलेला भात आढळला आणि शेजारी दहीपण सापडले. बाळा मनात विचार करू लागला की दहीभात तर मिळाला परंतु देवळाशेजारी काळा कुत्रा नेमका यावेळी असेल का? परंतु बाळाची ही उगीचच चिंता होती. सांगितलेल्या जागी (निर्दिष्ट स्थळीं) जाऊन पोहोचतो तोच एक काळे कुत्रे (कृष्ण श्वान) शेपूट (पुच्छ) हलवीत समोर येताना दिसले. असा योग जुळलेला पाहून बाळाला मोठा आनंद झाला. दहीभात खाऊ घातला आणि बातमी (वृत्तांत) बाबांना जाऊन सांगितली. तात्पर्य सांगायचे म्हणजे हा जो प्रकार घडला त्याबद्दल कोणी काहीही म्हणो, परंतु तेव्हापासून बाळाचा हिमज्वर गेला आणि त्याला आराम पडला. (ओ. ८८-९७)

असेच एकदा (नागपूरचे श्रीमंत) बापूसाहेब बुट्टी यांना पोटात थंडी होऊन एकसारखे जुलाब व लागोपाठ उलटचांवर उलटचा होऊ लागल्या. सर्व औषधांनी कपाट भरले होते, परंतु त्यातील एकही औषध लागू पडत नव्हते. बापूसाहेब मनात फार घाबरले व फार काळजीत (विचारी) पडले. सारखे जुलाब उलटचा होऊन ते फार अशक्त (क्षीण) झाले आणि नित्य नियमाप्रमाणे बाबांचे दर्शन घेण्याचीही त्यांना शक्ती राहिली नाही. ही गोष्ट बाबांच्या कानावर गेली. त्यांनी बापूसाहेबांना बोलावून आणवून आपल्यासमोर बसविले आणि म्हणाले, "खबरदार! यापुढे शौच्याला (मल+विसर्जनी) जायचे नाही आणि उलटी (वांती) सुद्धा आपल्या ठिकाणी राहिली पाहिजे." नंतर त्यांच्याकडे पाहून (अनुलक्षून) हाताच्या अंगठ्याजवळचे बोट (तर्जनी) हलवून बाबांनी पुन्हा तेच शब्द उच्चारले. गंमत म्हणजे त्या शब्दांचा दरारा (धाक) इतका की दोन्ही व्याधींनी पोबारा केला (पळून गेले) आणि बुट्टींना आराम वाटला. आणखी एकदा शिरडीत पटकीची साथ (वाख्याचा उद्भव) आली असताना त्याचा बुट्टींनाही त्रास झाला. उलटचा (वांती) व जुलाब (रेच) सारखे होऊन त्यांचा जीव तहानेने व्याकूळ (तृषाकूल) होऊन पोटात मळमळू लागले. डॉक्टर पिल्ले जवळच होते. त्यांनी सर्व उपाय खर्च केले (वेंचले). शेवटी जेव्हा काहीच उपयोग होईना तेव्हा ते बाबांकडे गेले. जसे जसे घडले होते तसे तसे सर्व सांगितले व विचारले, "कॉफी द्यावी का पाणी द्यावे? कोणते चांगले?" तेव्हा बाबा म्हणाले, "त्यांना दूध पाजा. अक्रोड, पिस्त्यांसकट बदाम खाऊ घाला. असे हे तरण (डाळ, तांदुळाच्या कण्या वगैरे पुष्कळ पाण्यात शिजवून काढलेले पाणी) प्यावयाला द्या. म्हणजे त्याची तहान राहील आणि चटकन रोग बरा होईल." आणि खरेच असे हे (विचित्र) तरण पाजल्यावर बुट्टींचा त्रास बरा झाला (उपद्रव+निरसन). "अक्रोड, पिस्ते, बदाम (हा सुका मेवा पचण्यास फार जड असतो) खाऊन पटकीला आराम पडावा हे तर महान आश्चर्यच. परंतु बाबांचा शब्द हेच विश्वासाचे (श्रद्धेचे) स्थान असले की सर्व काही सफळ होते. तेथे शंका मुळीच कामाला येत नाही (**शब्दचि बाबांचा विश्रामधाम। शंकेचे काम ना तेथें**). (ओ. ९८-१०९)

एकदा आळंदीचे एक स्वामी साईसमर्थांचे दर्शन घेण्याच्या इच्छेने शिरडी गावात आले आणि बाबांच्या निवासस्थानी (आश्रमी) म्हणजे मशिदीत येऊन पोहोचले. त्यांना कानाचा रोग (कर्ण+रोग) होता. त्यामुळे त्रासदायक झोपमोड (अस्वास्थ+निद्राभंग) होत असे. शस्त्रप्रयोग (शस्त्रक्रिया) करवूनही तिळमात्रही काही उपयोग झाला नव्हता. (शिरडीत आल्यावर) ठणका फारच वाढला (अनावर) व काही इलाज (प्रतिकार) चालेना म्हणून शिरडीहून निघण्याचा विचार केला आणि बाबांचा आशीर्वाद मागण्यासाठी ते गेले. साईचरणांना नमस्कार करून उदीप्रसाद पावल्यावर स्वामींनी सदासर्वदा कृपा असावी असा आशीर्वाद मागितला. माधवराव देशपांडे जवळच होते. त्यांनी स्वामींच्या कानाकरिता बाबांना विनंती केली आणि बाबांनीही "अल्ला अच्छा करेगा" असे म्हणून स्वामींना आश्वासन दिले. असा आशीर्वाद मिळाल्यावर

स्वामी पुण्याला (पुण्यपट्टणीं) परत गेले आणि तेथून आठ दिवसांनी त्यांचे पत्र आले की ठणका ज्याक्षणी बाबांनी आशीर्वाद दिला त्याक्षणीच थांबला. सूज मात्र कायम होती. पुन्हा शस्त्रक्रिया करावी म्हणून फिरून (मागुता) मुंबईला आलो व अगोदरच्याच (पुढील) डॉक्टरांकडे गेलो. परंतु बाबांना काय अडचण (सांकडे) वाटली कोण जाणे? कानाकडे पाहता डॉक्टरांना सूज कोणीकडे दिसेना (लक्षेना). डॉक्टर म्हणाले, "शस्त्रक्रियेची आता आवश्यकता नाही." (अशाप्रकारे बाबांच्या नुसत्या आशीर्वादाने) स्वामींची भयंकर (दुर्धर) चिंता दूर झाली आणि सर्वांना नवल वाटले. (ओ. ११०-११८)

अशीच आणखी एक कथा या प्रसंगाच्या अनुरोधाने क्रमप्राप्त झाली (ओघास आली) म्हणून श्रोत्यांना आता ती सांगून मग हा अध्याय आटोपता घेऊ या. मशिदीच्या सभामंडपाची फरशी (दगडाच्या चीपा) बसविण्याची ज्या दिवशी सुरुवात झाली त्याच्या आठ दिवस आधी काका महाजनींना (कै. लक्ष्मण गणेश महाजनी. पहा मागील अ. १२, ओ. ३४ वरील टीका) सहन न होणारे अजीर्ण झाले होते (मोडसी दुर्धर). त्यांना जुलाब फार होऊ लागले व ते अत्यंत त्रस्त (बेजार) झाले. पण मनातल्या मनात बाबांवर भार ठेवून औषध किंवा उपचार करीत नव्हते. साईबाबा पूर्ण अंतर्ज्ञानी (दुसऱ्यांच्या मनातल्या गुह्य गोष्टी जाणणारे) आहेत हे महाजनी जाणून होते. म्हणून हा त्रास त्यांनी बाबांना कळविला नाही. मनात जेव्हा येईल तेव्हा ते आपण होऊन तो घालवतील असा विश्वास असल्याने ती व्याधी ते सहन करीत (सोसून) राहिले. आपण सर्व भोग (दैवगतीने भोगावे लागणारे सुखदुःख) आनंदाने भोगू, परंतु (बाबांच्या) पूजेत खंड (खळ) पडू नये हीच एक प्रबळ इच्छा सदा काकांच्या मनात होती. पुढे जुलाब कितीही वेळा आणि केव्हाही जेव्हा होऊ लागले तेव्हा आरतीची सेवा चुकू नये म्हणून काकांनी काय केले पहा! एक तांब्या पाण्याने भरला आणि अंधारातही हाताला लागेल अशा जागी मशिदीत एका बाजूला ठेवला. स्वतः पाय दाबण्यासाठी (चरण+संवाहन) बाबांजवळ बसत, आरतीला नेहमी हजर राहत आणि आपला रोजचा नियम (नित्य नेम) पूर्ण करीत असत. जर पोटात कळ आलीच तर तांब्या हाताजवळ होताच. एकांत जागा पाहून शौच आटोपून (निर्+मळ होऊन) परत येत असत. असो. तात्याबांनी (तात्या कोते पाटील) फरशी करावयाची आज्ञा मागितल्यावर बाबा त्यांना काय म्हणाले पहा! "आम्ही लेंडीवर जात आहोत. तेथून परत आल्यावर या फरशीच्या कार्याला सुरुवात करा." पुढे बाबा परत आले, आसनावर जाऊन बसले आणि काका महाजनींनी वेळेवर येऊन पाय चेपणे सुरु केले. कोपरगावाहून टांगे येऊन पोहोचले (थडकले). त्यातून मुंबईकडचे भक्त येऊन पोहोचले, पूजेच्या साहित्या (संभार) सकट मशिदीत वर चढले आणि बाबांना नमस्कार केला. इतर मंडळींबरोबर अंधेरीचे पाटीलही आले आणि पूजेसाठी फुले, अक्षता वगैरे घेऊन वाट पाहत बसले. इतक्यात खाली पटांगणात जेथे रथ ठेवीत असत बरोबर तेथे कुदळी (जमीन खणण्याचे हत्यार) मारून फरशीची सुरुवात झाली. कुदळी मारण्याचा तो आवाज ऐकला मात्र बाबांनी विचित्र ओरड केली, डोळे भयंकर टवकारले (मोठे केले) आणि लगेच नृसिंहाचा अवतार धारण केला (खूप रागावले). "कुदळीचा फटका कोण मारत आहे? त्याला मी कंबरेत लटका (अधू) करतो," असे बोलत बाबा सटका (दंडा) घेऊन उठले आणि सगळ्यांना भीतीने धडका भरला. मजूर कुदळ टाकून पळाला. जो तो उठून धावत सुटला. काकांचासुद्धा जीव घाबरला (दचकला). इतक्यात बाबांनी त्यांचा हातच धरला आणि म्हणाले, "जातोस कोठे? बस खाली." मग तात्या कोते व लक्ष्मीबाई (हिलाच पुढे बाबांनी आपल्या प्राणोत्क्रमणाचे वेळी नऊ रुपयांचे अपूर्व दान दिले. तसेच भूक लागली म्हणून भाकरी आणण्यास सांगून ती आणल्यावर बाबांनी जवळच्या कुत्र्याला खाऊ घातली आणि क्षुधेने व्याकूळ झालेल्या मूक प्राण्याचीही भूक जाणावी याचे शिक्षण दिले. (पहा अ. ४२, ओ. ८६-१३०) आले. त्यांच्यावर देखील बाबांनी मनसोक्त शिव्यांचा भडिमार केला (लाखोली वाहिली). अंगणाबाहेर जी मंडळी होती त्यांनाही शिवीगाळ केली. इतक्यात बाबांनी तेथे पडलेली भाजलेल्या भुईमुगाची थैली ओढून घेतली. बाबा रागावलेले (त्वेषावेश) असताना जे भीतीने चहूकडे (चौपासी) पळून गेले त्यातील एखाद्याची ती मशिदीत पडलेली पिशवी असेल. दाणे असतील पक्का शेर (एक किलो). बाबांनी मूठमूठ बाहेर काढून हातावर चोळून फुंकर मारून साफ करण्यास सुरुवात केली. मग ते स्वच्छ झालेले दाणे महाजनींना खाऊ घालू लागले. एकीकडे शिव्या देणे आणि एकीकडे दाणे चोळणे चालूच होते. महाजनींना म्हणत, "खाऊन घे" आणि त्यांच्या हातावर साफ केलेले दाणे ठेवीत. काही आपल्या तोंडात टाकीत. अशा प्रकारे ती पिशवी संपविली (रिकामी केली). मग दाणे संपल्यावर म्हणाले, "मला तहान लागली आहे. पाणी आण." काकांनी झारी भरून पाणी आणले. स्वतः पिऊन काकांना "पी" म्हणाले. काकांनी पाणी पिऊन झाल्यावर म्हणाले, "जा, आता तुझी बृहती थांबली (गुदद्वार बंद झाले. जुलाब थांबले). ते ब्राह्मण कुठे मेले? जा, त्यांना घेऊन ये." असो. पुढे मंडळी आली, मशिद पूर्वीप्रमाणे भरली आणि फरशी लावण्यास पुन्हा सुरुवात झाली. काकांचे अजीर्ण (मोडशी) बरे झाले. जुलाबावर हे (भुईमुगाचे दाणे) कसले औषध! परंतु संतांचा शब्द म्हणजेच औषध असते. संत जो शब्द म्हणतील त्यालाच जे प्रसाद (कृपा म्हणून मिळालेली वस्तू) मानतील त्यांना दुसऱ्या कोणत्या औषधाची (अगद) जरूरी नसते. (ओ. ११९-१४७)

हरदा शहरचे (मध्य प्रदेशातील) एक गृहस्थ पोटशूळाच्या (मुरडा=आमांशादि विकाराने आंतडी पिळवटल्यासारखी होऊन पोटात होणारी व्यथा) व्याधीने चवदा वर्षे त्रस्त झाले होते. सर्व इलाज झाले होते (पण गुण येत नव्हता). त्यांचे नाव दत्तोपंत होते. त्यांनी कर्णोपकर्णी (एकाने ऐकून दुसऱ्याला सांगणे अशा तऱ्हेने) गोष्ट ऐकली की शिरडीत साई नावाचे महान संत आहेत, ज्यांच्या दर्शनाने सर्व रोग अपाय (उपाय) बरे होतात. अशी कीर्ती ऐकून दत्तोपंत शिरडीला गेले, साईंच्या पायांना नमस्कार केला आणि करुणा भाकू लागले, "बाबा! चौदा वर्षे झाली, पोटशूळाने पिच्छा पुरविला. पुरे हे दुखणे. अगदी कळस झाला आता. ते सहन करण्याची शक्तीही राहिली नाही. कोणाला मारले नाही किंवा कोणाचे नुकसान (घातपात) केले नाही. आईबापांचा कधी अपमान केला नाही (अवमानिली न मायतात). पूर्वजन्मीची गोष्ट (मात) तर आठवतच नाही. मग हे कष्ट मला कशाने बरे होतात?" संतांच्या केवळ प्रेमभरीत दृष्टीने (अवलोकन), त्यांच्या प्रसादरूपी आशीर्वचनांनी रोग बरा (व्याधि+निरसन) होतो. दुसरे (आन) काहीही लागत नाही. तसाच अनुभव दत्तोपंतांना आला. बाबांचा हात (कर) मस्तकावर पडताच आणि उदी (विभूति), आशीर्वाद पावताच मनाला आराम वाटला. मग महाराजांनी त्यांना काही दिवस शिरडीत ठेवून घेतले आणि हळूहळू त्यांचा पोटशूळाचा त्रास मूळासकट नाहीसा झाला. (मूळ पोथीत याच अध्यायाच्या ओ. १५५ वरील टीपमध्ये पोटशूळाची आणखी दोन उदाहरणे दिली आहेत. पहिले काका महाजनींचे वडील बंधू गंगाधरपंत यांचे. त्यांचा पोटशूळ बाबांनी त्यांच्या पोटाला हात लावून, "येथे दुखते का?" असे विचारून, "अल्ला बरे करील" असे म्हणून बरा केला. दुसरे उदाहरण नानासाहेब चांदोरकरांचे आहे. त्यांचा पोटशूळाचा विकार बर्फी तुपात खलून खाण्यास सांगून बाबांनी अजिबात बंद केला. आणखी असलेच एक उदाहरण ओ. १४७ च्या टीपमध्ये माधवराव देशपांडे यांचे दिलेले आहे. पूर्वी त्यांना मूळव्याध झाली होती तेव्हा बाबांनी त्यांना सोनमुखीचा काढा करून पाजला होता व मूळव्याध बंद झाली होती. म्हणून दोन वर्षांनी पुन्हा मूळव्याध झाल्यावर माधवरावांनी आपल्या विचारानेच तसला काढा घेतला. पण मूळव्याध बरी तर झाली नाहीच, पण आणखीच भडकली. पुढे ती बाबांच्या कृपेने बरी झाली. तात्पर्य म्हणजे गुण बाबांनी सांगितलेल्या औषधात किंवा उपायात नसून त्यांच्या हातात व आशीर्वादात असे.) (ओ. १४८-१५५)

असो. असे हे महात्मे (महानुभाव)! त्यांच्या मनाच्या थोरपणाचे (प्रभावाचे) मी काय वर्णन करू! सर्व सजीव आणि निर्जीव वस्तूंवर (चराचरीं) त्यांचा सद्भाव असतो आणि परोपकार करणे हा त्यांचा स्वभाव असतो. ही शब्दस्तुती (स्तोत्र) गाऊ जाता एकापेक्षा एक नाना प्रकारच्या गोष्टी आठवतात. तेव्हा आता मागील संगतीने भीमाजींचे चरित्र पुढे चालवू या. असो. बाबांनी थोडी उदी मागविली. भीमाजींना थोडी दिली, थोडी त्यांच्या कपाळाला फासली व आपला हात त्यांच्या डोक्यावर ठेवला. मुक्कामावर (बिऱ्हाडी) परत जाण्याची आज्ञा झाली आणि पाटलांना हुशारी वाटून ते पायांनी चालतच गाडीपर्यंत निघाले. तेथून बाबांनी सांगितलेल्या (निर्दिष्ट) जागी (भीमाबाईंच्या घरी) ते गेले. ती जागा जरी अडचणीची व लहान (संकुचित) होती तरी बाबांनी सुचविली होती हेच तिचे महत्त्व होते. मातीचे ताजे थर (नवथर) देऊन चोपण्याने (जमीन चोपण्याचे गवंड्याचे हत्यार) जमीन सपाट व गुळगुळीत केलेली (चोपिली) असल्याने ती ओली होती. तरी पाटलांनी ती बाबांची आज्ञा मानली आणि तेथेच सोय लावली. भीमाजीच्या गावात पुष्कळ ओळखी होत्या. सुकी जागा मिळाली असती. परंतु बाबांच्या तोंडी जे स्थान आले ते सोडून आणखी दुसऱ्या स्थानाचा पाटलांनी विचारच केला नाही (नव जाणे). तेथेच (धान्य ठेवण्याची रिकामी) दोन पोती (गोण) पाथरली आणि त्यावर अंथरूण पसरून भीमाजी स्वस्थ मनाने झोपले (शयन केले). मग त्याच रात्री अशी गोष्ट घडली. भीमाजींना स्वप्न पडले. बालपणीचे पंतोजी (शाळा मास्तर) आले आणि पाटलांना मारू लागले. हातात एक वेताची काठी (छडी) घेऊन मारमारून त्यांची पाठ फोडली. सवाई (कवितेचे एक वृत्त किंवा छंद) तोंडपाठ (मुख+उद्गत) होण्यासाठी आपल्या शिष्याला फार कष्ट (त्रास) दिले. सवाई तरी ती कोणती होती याचे मोठे कुतूहल (जिज्ञासा) श्रोत्यांना असेल म्हणून तिची अक्षरे न् अक्षरे जी मी ऐकली ती सगळीच देतो:

(सवाई)

**"जीस गमे पद अन्य गृहीं,**
**जर ठेवियलें जणुं सर्पशिरीं।**
**वाक्य जिचें अति दुर्लभ,**
**ज्यापरि दुर्मिळ तें धन लोभिकरीं।**
**कांतसमागम तेंच गमे सुखपर्व,**
**नसे जरि वित्त घरीं।**
**शांत मनें निजकांतमतें,**
**करि कृत्य 'सती' जनिं तीच खरी।।"**

(दुसऱ्या घरी पाऊल ठेवले तर जिला जणूकाय सापाच्या डोक्यावर पाय ठेवल्यासारखे वाटते, जिच्या तोंडचे शब्द ऐकणे अगदी कठीण असते, जणूकाय धनलोभीच्या हातचा पैसाच, पतीचा सहवास (समागम) हीच जिची सुखाची अमोल संधी (सुख+पर्व) असते, मग घरात पैसा (वित्त) असो वा नसो, आणि आपल्या पतीच्या आवडीप्रमाणे कोणतेही काम जी संतुष्ट

मनाने करते, तीच या जगात खरी 'सती (पतिव्रता)' होय.)

परंतु ही शिक्षा (शासन) कशासाठी ती गोष्ट (गोठी) काहीच कळत नव्हती. पंतोजी वेताची छडी (वेताटी) टाकत नव्हते. ते मोठ्या (अनिवार) हट्टाला पेटले होते. नंतर लगेच दुसरे स्वप्न पडले. ते तर याहून विलक्षण होते. कोणी एक गृहस्थ येऊन छाती दाबून (दडपून) बसला. त्याने हातात वरवंटा (मसाला, चटणी इ. पाट्यावर वाटण्यासाठी केलेला उभट वर्तुळाकार घोटीव दगड) घेतला आणि भीमाजींच्या छातीचा (वक्षःस्थळाचा) पाटा (मसाल्याचे पदार्थ ज्यावर ठेवून वरवंट्याने वाटतात तो सपाट दगड) केला. भीमाजींचे प्राण कासावीस होऊन कंठाशी (गळ्याशी) आले. जणूकाय वैकुंठाला (स्वर्गाला) निघाले. मग स्वप्न संपले आणि भीमाजींचा डोळा लागला (गाढ झोप लागली). त्यामुळे मनाला थोडी विश्रांती (विरंगुळा) मिळाली. पुढे सूर्य उगवला (उदयाचला सूर्य आला) आणि पाटील जागे झाले. त्यांच्या मनाला अपूर्व हुशारी वाटली, रोगाची कल्पना मूळासकट मावळली (नाहीसी झाली). पाटा, वरवंटा आणि छडीच्या खुणा पाहण्याची आठवणच कोणाला होती? स्वप्नाला लोक आभास (चुकीचे पण खरे वाटणारे दृश्य) म्हणतात, परंतु कधीकधी त्याचा उलट अनुभव (प्रतीति) येतो. पाटलांच्या त्याच क्षणी रोगाचा पूर्णपणे नाश (रोग+उच्छित्ति) होऊन दुःखाचे निवारण झाले. पाटील मनात फारच संतुष्ट झाले (धाले). त्यांना वाटले जणूकाय आपला पुनर्जन्मच झाला. ते हळूहळू बाबांच्या दर्शनाला निघाले. बाबांचा चंद्ररूपी चेहरा (मुख) पाहून पाटलांच्या आनंदरूपी समुद्राला भरती आली. त्यांचा स्वतःचा चेहराही आनंदाने फुलला (भरते दाटले आनंदमुद्रा), डोळ्यांना ग्लानी येऊन ते झाकले गेले (नयनां तंद्रा लागली) आणि त्यांतून प्रेमाश्रूंचे लोट वाहू लागले. त्यांनी बाबांच्या पायांवर मस्तक (ललाट) ठेवले आणि म्हणू लागले, "वेताच्या शिक्षेचा आणि छाती फाटण्याचा (हृदय+स्फोट) परिणाम बिनचूक (स्पष्ट) गुणकारक झाला. या उपकाराची फेड करणे (उतराई) मला पामराला काही शक्य नाही म्हणून मी बाबांच्या पायी फक्त डोके ठेवतो. यानेच माझे समाधान (भरपाई) होईल. दुसरा काही याहून उपाय नाही. हे बाबा साई! आपली नवलाई अचिंत्य व अतर्क्य आहे." असो. असे हे पोवाडे (पराक्रमाची स्तुती-स्तोत्रे) गात पाटील तेथे महिनाभर राहिले. पुढे नानासाहेबांचे उपकार आठवत कृतार्थ (आपले साध्य-कार्य पूर्ण झाल्याचे समाधान पावलेले) होऊन पाटील आपल्या गावी परतले. (ओ. १५६-१७८)

असे ते भक्तीश्रद्धायुक्त (अन्वित) व आनंदपूर्ण (भरीत) चित्त झालेले आणि साईकृपेच्या उपकाराची जाणीव असलेले (कृतज्ञयुक्त) भीमाजी पाटील वरचेवर शिरडीत येत असत. साईबाबांना दोन हात, एक मस्तक, अनन्य श्रद्धा आणि अढळ विश्वास (स्थैर्य) हेच फक्त लागतात. पावलेल्या उपकाराची भक्ताने जाणीव ठेवली (कृतज्ञता ते व्हावी) म्हणजे झाले. कोणी संकटाने गांजला (विपद+ग्रस्त) म्हणजे जसा श्री सत्यनारायणाला नवस करतो आणि संकटातून पूर्णपणे मुक्त झाला म्हणजे जसा त्याचे व्रत सर्व विधीसह यथास्थित करतो (साङ्ग आचरत), तसेच पाटील तेव्हापासून (तैं पासाय) सत्यसाईंचे व्रत यथाशास्त्र स्नान करून, ब्रह्मचर्यासारखे व्रताचे नियम पाळून प्रत्येक गुरुवारी सतत करू लागले. लोक सत्यनारायणाची कथा वाचत तर भीमाजी दासगणूकृत अर्वाचीन भक्तलीलामृतातील (पहा अ. २, ओ. २४-२६ वरील टीका) साईंचे चरित्र प्रेमपूर्वक वाचत असत. त्या ग्रंथाच्या (भक्तलीलामृताच्या) पंचेचाळीस अध्यायांत दासगणूंनी अनेक भक्तांची चरित्रे वर्णन केलेली आहेत. त्यातील साईनाथांबद्दलचे तीन अध्याय (अध्याय+त्रयीं) हीच ती सत्यसाईची कथा, जी सर्व व्रतांमधील हे उत्तम व्रत आचरताना पाटील वाचत असत. त्यामुळे त्यांना अमर्याद (अपरिमित) सुख लाभले आणि त्यांचे मन शांत झाले. पाटील नेहमी स्नेहीसोबतींसह, सगेसोयरे गोळा करून आनंदित मनाने नियमित सत्य-साईव्रत करीत असत. नैवेद्याची तीच सवाई (नैवेद्यातील प्रत्येक पदार्थ पीठ, तूप, साखर वगैरे सवापट म्हणजे चतुर्थांशाने अधिक घेणे; उदा. सवाशेर, सवाकिलो), मंगल उत्सवही पहा तसाच. तेथे नारायण (श्रीविष्णू) तर येथे साई. दोन्ही ठिकाणी कशातही कमतरता (न्यून) नव्हती. पाटलांनी अशी पद्धत (पाठ) घालून दिली आणि तोच प्रघात (परिपाठ) गावात पडला. मग तेथे सत्य-साईव्रताचे पाठ लागोपाठ चालले. असे हे कृपाळू संत, भक्तांचा उदयकाळ आला (भाग्य उगवले) म्हणजे नुसत्या दर्शनाने संसारातील चिंता दूर करतात (हरिती भव+जंजाळ) आणि काळालाही (मृत्यूलाही) मागे परतवितात. (ओ. १७९-१८९)

आता येथून पुढील कथेत एकाच्या पुत्रप्राप्तीची चिंता (संतति चिंता) आणि संतासंतांची एकात्मता (आत्मा एकच असणे) यांचे वर्णन ऐकून चमत्कार वाटेल. नांदेड शहरचा (महाराष्ट्रातील मराठवाड्यातील एका जिल्ह्याचे शहर) एक रहिवाशी एक मोठा श्रीमंत पारसी (पारसी जातीचा) साईबाबांचा आशीर्वाद मिळवेल आणि त्याच्या पोटी पुत्र येईल. तेथील मौलीसाहेब नावाच्या संताची खूण बाबा पटवितील आणि तो पारसी आनंदयुक्त होऊन आपल्या गावी परत जाईल. ही कथा अति प्रेमळ आहे. श्रोत्यांनी स्वस्थ चित्ताने ऐकावी, म्हणजे त्यांना साईंची व्यापकता तसेच वत्सलता कळून येईल. हेमाडपंत साईबाबांना शरण आले आहेत. संतांना आणि श्रोत्यांना नमस्कार करीत आहेत. पुढील अध्यायात हे निरूपण काळजीपूर्वक ऐकावे. (ओ. १९०-१९४)

सर्वांचे कल्याण असो. अशा प्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या भक्त हेमाडपंत यांनी रचलेल्या श्री साई समर्थ यांच्या सत्य (वास्तविक) चरित्राचा **"भीमाजी क्षय निवारण"**

(श्री साईबाबांनी भीमाजी पाटलांचा क्षयरोग बरा करणे) नावाचा तेरावा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्गुरु साईनाथांना अर्पण असो. सर्व मंगल असो.**

## अध्याय १३ ची आणखी टीका

या अध्यायात सांगितलेल्या कथांतून भक्तांचे रोग आपल्या नुसत्या शब्दाने व आशीर्वादाने बाबा कसे बरे करीत असत हे आपल्याला कळते. कधी कधी त्यांचे उपाय विचित्र व अघोरही असत. तरीसुद्धा भक्तांना आराम पडत असे. तात्पर्य म्हणजे गुण औषधात किंवा उपायात नसून बाबांच्या हातात व आशीर्वादात असे.

भीमाजीची कथा सांगताना हेमाडपंतांनी काही सिद्धांत स्पष्ट करून सांगितले आहेत:

(१) पहिला म्हणजे या जगात मनुष्यप्राण्याला देवाने बुद्धी दिली असली तरी ती वापरून मनाने ठरविल्याप्रमाणे तो वागू शकत नाही. त्याच्यामागे कर्मतंत्र लागलेले असते. जन्मोजन्मी केलेल्या कर्मांचे संस्कार व त्यांचे भोगावयाचे परिणाम त्याला भलतीकडे ओढून नेतात:

**पुण्याकडे लक्ष जाय।**
**पापाकडे ओढिती पाय।**
**सत्कर्माचा शोधितां ठाय।**
**कुकर्मीं काय आतुडे॥३०॥**

म्हणून सत्कर्मे करून परमार्थ साधण्यासाठी माणसाला खूप प्रयत्न करावे लागतात, एवढेच नव्हे तर सद्गुरूची कास धरावी लागते.

(२) दुसरा सिद्धांत म्हणजे माणसाने सुखासाठी अहोरात्र प्रयत्न करूनही पूर्वकर्माची फळे म्हणून दुःखे गळी पडतात. जणूकाय ती त्याला शोधीतच येतात:

**वारूं जातां गळां पडती।**
**झाडूनि टाकितां अधिक लिपडतीं।**
**वाउगी जीवाची धडपड ती।**
**अहोराती तो शीण॥२६॥**

ती भोगल्याशिवाय गत्यंतर नसते. आत्महत्या करून किंवा अन्य उपायांनी ती टाळता येत नाहीत, पुन्हा जन्म घेऊन ती भोगावी लागतात. जीवन्मुक्तालाही म्हणजे जिवंतपणीच आत्मज्ञान होऊन मुक्त झालेल्यालाही प्रारब्धभोग सुटत नाहीत. तेव्हा असली दुःखे सहन करण्याची माणसाने तयारी ठेवावी. या जन्मी आपण नीतीने वागतो तरी असली दुर्धर दुःखे का येतात म्हणून निराश होऊ नये आणि

**'शुद्धाचरणें वर्ततां।**
**कां मजला हे दुःखावस्था।**
**दुष्कर्माच्या वाटे न जातां।**
**कां मज माथां पाप हें' ॥अ.३४/५४॥**

असे वारंवार म्हणू नये.

(३) तिसरा सिद्धांत म्हणजे असली दुःखे निवारण्याचा एकमात्र उपाय आहे. तो म्हणजे सद्गुरूला किंवा एखाद्या संताला शरण जाणे. त्याची कृपादृष्टी झाली तर माणसाला ते दुःख सहज यातनेशिवाय भोगणे शक्य होते. खरे म्हणजे सद्गुरू किंवा संत ते दुःख भोगण्याला आपल्याला धैर्य देतात.

**तथापि भाग्यें संतदर्शन।**
**हें एक व्याधीचें उपशमन।**
**व्याधिग्रस्त मग व्याधींचें सहन।**
**दुःखेंवीण सहज करी॥८३॥**
**व्याधी दावी भोग दारुण।**
**संत ठेवी दृष्टि सकरुण।**
**तेणें भोक्तृत्व दुःखावीण।**
**संत निवारण करितात॥८४॥**

पण कित्येक प्रसंगी मनात आल्यास सद्गुरू किंवा संत आपल्या दैवी शक्तीचा उपयोग करून भक्ताचे ते दुःख एकवटून त्याला ते एकदम भोगावयाला लावून त्याची लवकर सुटका करतात— (उदा. भीमाजींचा क्षयरोग बाबांनी त्याला एका रात्रीत स्वप्नात छडी, पाटा, वरवंटा यांच्या माराने तीव्रपणे भोगावयास लावून लगेच बरा केला. तसेच पुढे अ. ३४ मध्ये डॉ. पिल्ल्यांच्या सुजलेल्या पायावर अब्दुल्लाचा पाय पाडून त्यांना अति कळवळण्यास लावून बाबांनी त्यांचा नारू तळास घातला आणि दहा दिवसांत अगदी बरा केला) किंवा ते दुःख आपल्या स्वतःकडे घेऊन त्या भक्ताला मोकळे करतात. (उदा. मागे अ. ७ मध्ये बाबांनी दादासाहेब खापडर्यांच्या लहान मुलाच्या ग्रंथिज्वराच्या गाठी आपल्या अंगावर घेऊन त्याला वाचविले.)

शेवटी या अध्यायात भक्ताने सद्गुरूला किंवा संताला आपली कृतज्ञता कशी व्यक्त करावी हे आपणाला शिकावयाला मिळते. संतांची त्यांच्या भक्तावर **'लाभेवीण प्रीत'** असते व ते सदा **'अवाप्तकाम'** (सर्व इच्छा पूर्ण झालेले) असतात. तेव्हा त्यांच्या उपकारांची फेड करण्यासाठी खालील ओवी लक्षात ठेवावी.

**दोन हात एक माथा।**
**स्थैर्य श्रद्धा अनन्यता।**
**नलगे दुजें साईनाथा।**
**एक कृतज्ञता ते व्हावी॥१८०॥**

# अध्याय १४ वा

**''रतनजी – साई समागम:''**

(नांदेडच्या रतनजी शेठचा साईबाबांशी निकट संबंध)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु महाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्‌गुरु साईनाथांना नमस्कार असो.

हे संतश्रेष्ठा श्री साईनाथा! तुझा जयजयकार असो. हे दयाळा, गुणगंभीरा (अतर्क्य गुण असलेल्या), निर्विकारा (विकारात म्हणजे मनोवृत्तीत किंवा स्वभावात बदल न होणाऱ्या), परात्परा (अत्यंत श्रेष्ठ म्हणजे ईश्वर असलेल्या), अपारा (ज्याचा अंतच लागत नाही अशा) व निरवद्या (अगदी दोषरहित असलेल्या) साईनाथा तुझा जयजयकार असो. आपल्या भक्तांसाठी मनात दया असल्याने त्यांच्या दृष्टीच्या पलीकडील गोष्टींवर (अलक्ष्यीं) लक्ष (दृष्टी) ठेवून तू त्यांना अनेक कारणांनी भेट देऊन, त्यांना संकटांतून सोडवितोस (तारिसी). दीनांचा उद्धार करण्यासाठी, भक्तांच्या आवरण्यास कठीण (दुर्धर), वाईट वासनारूपी दुष्ट राक्षसांचा (निशाचरांचा) वध करण्यासाठी साईबाबांचा देखील हा एक ईश्वरी अवतार (लीला अवतार) होता. जे जे चांगल्या मनोवृत्तीने (सद्+भावे) त्यांच्या दर्शनाला आले, ते ते स्वानंद-रस प्याले (विषयसुखापासून मन आवरून परमात्म्याचे ध्यान लागल्याने होणारा हर्ष त्यांना झाला.), त्यांचे हृदय (अंतरीं) आनंदाने भरून आले आणि ते प्रेमाने (भक्तीने) डोलू लागले. अशा या सर्वगुणसंपन्न साईसमर्थांच्या चरणांवर हीन,दीन व अति नम्र अशा माझ्या पामराचा साष्टांग नमस्कार (प्रणिपात) असो. (ओ. १-५)

आता पूर्वीच्या कथेच्या अनुसंधानाप्रमाणे काळ्या कुत्र्याने दहीभात (दधि+ओदन) खाल्ल्याने (बाळा शिंप्याचा) हिंवताप गेल्याच्या कथेचे वर्णन झाले. लवकर बरी न होणारी (बापूसाहेब बुट्टींची) पटकी (वाखा) नुसत्या तर्जनीचा (अंगठ्याजवळच्या बोटाचा) धाक दाखविल्याने व तरण प्यावयाला दिल्याने आणि (काका महाजनींची) मोडसी (जुलाब) भाजलेले भुईमूग खावयाला दिल्याने बरी झाली. तसाच एकाचा पोटशूळ, एकाचा मूळासकट कर्णरोग व एकाचा महाप्रबळ क्षयरोग नुसत्या दर्शनानेच नष्ट झाला. श्री साईकृपेने भीमाजी पाटलांचे दुःख नाहीसे होऊन ते सुखसंपन्न झाले आणि साईबाबांच्या चरणी कृतज्ञतापूर्वक पूर्णपणे अखंड शरण आले. तसाच हादेखील नवीन (अभिनव) तऱ्हेचा अपूर्व चमत्कार श्रोत्यांची ऐकण्याबद्दलची अत्यंत उत्सुकता (आदर) पाहून सादर करतो. श्रोते जर लक्ष देऊन ऐकणारे (स+अवधान) नसले तर वक्त्याला स्फूर्ती कशी येईल, कथेला उत्कृष्टपणा (गुणाचे चढेल लक्षण) कोठून येईल आणि ती रसपूर्ण कशी होईल! वक्ता काय कथन करील! तो तर सर्वथा श्रोत्यांच्या आधीन असतो. श्रोतेच त्याचे आधार (अवलंबन) असतात व त्यांच्यामुळेच कथेची गोडी (रस) वाढते. (ओ. ६-१२)

आधीच हे संत-चरित्र बाहेरून व आतून (बाह्याभ्यंतर) गोड आणि संतांचे आहार (खाणे-पिणे) व विहार (चालणे-फिरणे) ही गोड (शुद्ध आणि चांगले) आणि त्यांनी सहज उच्चारिलेले शब्दही गोड (मधुर) असतात. हे नुसते चरित्र नाही तर स्वानंद (विषयसुखांपासून मन आवरून परमात्म्याकडे ध्यान लागल्यावर होणारा आनंद) रूपी जीवन (पाणी) आहे, ज्या साधनाचा वर्षाव अत्यंत दयाळू साईमहाराज यांनी आपल्या भक्तांना आपली आठवण राहावी म्हणून (निज+स्मरणा) प्रेमाने केला आहे. सत्पुरूषांच्या असलेल्या कथा प्रपंच आणि परमार्थ अशा (दोन्ही) बद्दल असतात. प्रवृत्तीच्या (प्रपंच नीट कसा करावा याच्या) गोष्टी सांगता सांगता ते निवृत्तीच्या (परमार्थ साधण्यासाठी वैराग्याच्या) मार्गाला लावतात. हेतू हा की संसारात सुखाने नांदावे (वर्तावे) परंतु नित्य सावध असावे व देहाचे सार्थक करावे. अनंत पुण्याईंच्या बळाने जीवाला अनपेक्षितपणे (अवचटें) मनुष्यशरीर (नरदेह) लाभते. त्यातसुद्धा ज्याला परमार्थ साधतो (आकळे) त्याचे भाग्य तर एक वेगळेच (आगळे) असते. परंतु हे (मानवी शरीर) लाभूनही जो त्याचे सार्थक करत नाही तो विनाकारण (निरर्थक) पृथ्वीला ओझे (भू+भार) म्हणून जन्मला असेच म्हणायला हवे. त्याला पशूपेक्षा जगण्याचे आणखी काय मोठे सुख मिळाले! ज्याला आहार, निद्रा (झोप), भय (भीती) व मैथून (स्त्रीसंभोग) याहून दुसरे माहीत नाही, तो पुरुष शेपूट व शिंगे नसलेला (पुच्छ+विषाण+विरहित) केवळ पशूच नव्हे का! या मनुष्यजन्माचे केवढे महत्त्व आहे! त्यामुळेच ईश्वराची भक्ती साध्य होते व चारही मुक्ती (सायुज्य, सालोक्य, सारूप्य व सामीप्य) पायाशी लागतात. आत्मज्ञानाची प्राप्तीदेखील यामुळेच होते. संसार हा आकाशातील ढगांच्या समूहातील चमकणाऱ्या वीजेप्रमाणे (मेघमंडळी विद्युल्लेखा) फार वेळ न टिकणारा (चंचल) असतो. काळ (मृत्यू) रूपी सर्पाने ग्रासलेल्या (काल+अहि+ग्रस्त) लोकांना सुखाची घटिका (२४ मिनिटे) देखील क्वचित लाभते. आई, बाप, बहीण (भगिनी), भाऊ (भ्राता), पत्नी (दारा), मुलगा, मुलगी (सुता) व चुलता हे सर्व नदीच्या प्रवाहात जसे लाकडाचे ओंडके वाहता वाहता एकत्र येतात तसेच हे या संसारात एखादा क्षण एकत्र आलेले दिसतात. पण जर का एखाद्या जोराच्या लाटेने फाटाफूट होऊन त्यांची एकमेकांची ताटातूट झाली तर तो पूर्वीचा घाट पुन्हा जुळतच नसतो. या जगात ज्याने आपले हित साधले नाही त्याने आपल्या

आईला (जन्म द्यावयास लावून) व्यर्थ त्रास दिला (व्यर्थ शिणविली जननी). संतांच्या चरणी जर तो लागला नाही तर त्याचे जन्माचे नुकसान होईल. प्राणी जेव्हा जन्माला आला तेव्हाच मृत्यूच्या मार्गाला लागला (त्याची मरणाच्या वाटेची चाल सुरू होते). म्हणून आज, उद्या किंवा परवा (पर्यंत मृत्यू थांबेल) असा ज्याने विश्वास धरला तो फसलाच समजावा. या मरणाचे सदा स्मरण ठेवावे. हे शरीर नुसते काळाचे खाद्य (वैरण) आहे. एकूण संसाराचे हे असे (अशाश्वत) लक्षण आहे. म्हणून माणसाने सदा सावध असावे. व्यवहारात चौकसपणे (काळजीपूर्वक तपास करून शहाणपणाने) पाऊल ठेवले म्हणजे परमार्थ (मानवाचे श्रेष्ठतम इप्सित म्हणजे मोक्ष) विनाकष्ट हाती लागतो. म्हणून प्रपंचात आळस नसावा व पुरुषार्थ (मानवी आयुष्यात साध्य करावयाच्या धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार गोष्टी) प्राप्त करण्याबाबतीत कधीही बेफिकीर (उदास) असू नये. (पहा श्री दासबोध, समास १, दशक १२ – **आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थविवेका। येथे आळस करू नका। विवेकी हो॥**) (ओ. १३-२७)

साईकथा जे प्रेमाने ऐकतात त्यांना निःश्रेयसाची (सर्वांत उत्तम गोष्टीची) प्राप्ती होईल, त्यांची साईचरणी भक्ती वाढेल व त्यांना सुखाचा भांडार लाभेल. ज्यांना साईबाबांचे संपूर्ण प्रेम असेल त्यांना या कथांचा संग्रह (साठवण) साईंच्या चरणकमलांची (पंकजांची) पदोपदी आठवण देईल. ज्याचे शब्दांनी वर्णन करता येत नाही त्याचे या कथेत शब्दांनी वर्णन आढळते (निःशब्दाचें शब्दें कथन). जे इंद्रियांच्या पलीकडे आहे त्याचे या कथेतून इंद्रियांनी (कान, डोळे वगैरेंनी) सेवन केले जाते (अतींद्रियाचें इंद्रियें सेवन). म्हणून हे कथारूप अमृत कितीही प्याले तरी मनाचे पूर्ण समाधान होणे कठीण आहे. संतांचे कौशल्य (विंदान) अतर्क्य आहे. त्यांचा महिमा अवर्णनीय आहे. त्याचे शब्दांनी (वाचे) संपूर्णपणे वर्णन करण्याला कोण बरे समर्थ असेल! या कथा नेहमी कानावर पडल्या की साईबाबा डोळ्यासमोर सारखे दिसतील, रात्रंदिवस मनात व ध्यानात राहतील आणि आठवणीत व चिंतनातही राहतील. (एवढेच काय) जागे असताना व स्वप्नातदेखील दिसतील आणि बसले असताना, झोपले असताना व जेवत असतानाही (जवळ) दिसतील. गर्दीत किंवा रानावनात जा, तेथेही सर्वदा बरोबर येतील, जातील (गमनागमनीं). अशाप्रकारे आपल्याला त्यांचा एकसारखा छंद लागला (येता निदिध्यासनीं) की आपल्या मनाची परमेश्वराच्या ठिकाणी लय लागलेली (उन्मनी) स्थिती होईल. असे दररोज (अनुदिनीं) होऊ लागले की चित्त चैतन्यात (विश्वाला चैतन्य देणाऱ्या शक्तीत म्हणजे परमात्म्यात) एकरूप (समरस) होईल. (ओ. २८-३४)

आता पुढच्या कथेचा संबंध जो मागच्या अध्यायाच्या शेवटी सांगितला त्याची सुरुवात करू या. श्रोत्यांनी आदरयुक्त व्हावे. भावभक्तीची शिरापुरी कितीही खाल्ली तरी सदा अपुरीच राहते. अगदी पोटभर खाल्ली तरी कधीही पूर्णपणे तृप्ती होत नाही. असो. श्रोत्यांनो! आता ही दुसरी कथा आपण जर लक्ष देऊन ऐकली तर संतांच्या दर्शनाच्या सार्थकतेची मनाला खात्री पटेल. बाहेरून दिसायला (बाह्यतः) साईबाबा काहीच करीत नसत, आपली जागा सोडून कोठेही जात नसत, तरीसुद्धा बसल्याजागी ते सर्व काही जाणत आणि सर्व लोकांना तसा अनुभवही देत असत. (ओ. ३५-३८)

जे त्रिकाळीसुद्धा अबाधित अस्तित्वरूपी तत्त्व म्हणजे ब्रह्म आपल्या शरीरात असते (सत्+तत्त्व निज+पिंडी). तेच संपूर्ण जगात (अखिल ब्रह्म+अंडात) असते. ही गोष्ट आपल्या शरीराचे भान विसरून (कायेची करोनि कुरवंडी) सतत लक्षात ठेवा (अखंडित अवलोका). या सत्तत्त्वाला जो शरण गेलेला असेल त्याची सर्वांशी एकरूपता (एकत्व) असते हे जाणावे. कारण वेगवेगळेपणा (नानात्व) धरला की जन्ममरणाची परंपरा मागे लागते. आपण व जगातील इतर सर्व प्राणी व वस्तु वेगवेगळे आहेत असे ठसविणारी (नानात्व स्थापणारी) जी बुद्धी म्हणजेच खरोखरचे (त्रिशुद्धी) अज्ञान (अविद्या) होय! गुरुच्या भेटीने वा शास्त्रांच्या अभ्यासाने (गुरु+आगम) चित्ताची शुद्धी होऊन ब्रह्ममय होण्याची (स्वस्वरूप) स्थिती प्राप्त होते. अविद्येपासून मुक्त (निवृत्त) होणे म्हणजेच एकत्वाची प्राप्ती होणे होय! मनात थोडासादेखील भेदभाव असेल तर मग एकमेव (अनन्य) स्थिती ती कसली! ब्रह्मदेवापासून ते न हलणाऱ्या सर्व वस्तूंपर्यंत (स्थावर+अन्त) जे जे आपणाला स्वस्वरूप किंवा ब्रह्म यापासून वेगळे (उपाधि+समन्वित) दाखविते व जे जे सत्यासत्य नित्यानित्य यांतील भेद जाणण्याचे ज्ञान नसलेल्यांना (अविवेकिया) ब्रह्म नसलेलेच भासते (अ+ब्रह्म+वत्) ते ते चोहोबाजूंनी (ओतप्रोत) ब्रह्मच असते. सर्व प्रकारचे गाढ ज्ञान असणे हा ज्याचा स्वाभाविक गुण आहे (सकल विज्ञान+घन+स्वभाव), संसारातील कर्तव्यांना (धर्मा) जेथे वाव नाही आणि जेथून नाव व रूप यांचा ठिकाणाच पुसून टाकलेला आहे, तेच हे अवयवांशिवायचे (निरवयव) ब्रह्म होय! आपणाला स्वस्वरूप किंवा ब्रह्म यांपासून वेगळे समजण्याच्या स्वभावामुळे (उपाधि+स्वभाव+भेदे), अज्ञान व मोह यांच्या घोडचुकांमुळे (प्रमादे) जे चित्त नानात्वाच्या संभ्रमात घोटाळते (लोधे) त्याला एकत्वाचे ज्ञान झाले (बोधें) की ते स्वस्थ होते. मी वेगळा, इतर लोक वेगळे असे ज्यांना काही निराळे दिसत नाही, ज्यांना हे सर्व जग अखंड व एकाच रसाने भरलेले व त्याशिवाय आणखी दुसरे काही शिल्लक राहिलेलेच नसते, ज्यांना नाव व रूप यांसह कार्य करणे ही कटकटच (उपाधी) वाटते, ज्यांनी नानात्व (वेगळेपण) सर्वदा टाकून दिलेले असते त्यांचे ब्रह्म होणे ते हेच होय! (या जगात) आपणच फक्त आहोत, आपल्याशिवाय दुसरी रिकामी जागाच नाही, आपण दाही दिशा पूर्णपणे व्यापून आहोत आणि आपल्याशिवाय

दुसरे काही (जगात) नाही हीच भावना दृढपणे धरावी. भूलविणाऱ्या भावनेला दूर सारावे. आपल्याशिवाय दुसरी परकी वस्तु नाही हे लक्षात ठेऊन आपली दृष्टी (निजस्वरूपात) आवरून ठेवावी. श्रोत्यांना सहज शंका येईल की हा भेदभाव कसा उत्पन्न होतो? द्रव्य ही जाणण्याची वस्तु (ज्ञेय) व जीव हा ते जाणण्याचा प्रयत्न करणारा (ज्ञाता), ही अशी (नानात्वाची) भावना जाणण्याला उपाय कोणता? थोडीशी जरी भेदबुद्धी असेल तर अनन्यत्वाचा (एकत्वाचा) नाश होतो. तात्काळ नानात्वपण उत्पन्न होते व हेच जन्ममरणाला कारण होते. अविद्यारूपी अंधारी दृष्टी (तिमिरदृष्टी) दूर झाली की सर्व सुदृष्टीदेखील दिसेनाशी होते (लोपे) व दृष्टीमध्ये (दिठीं) फक्त स्वस्वरूपच भरून राहते आणि नानात्व लगेच पळून जाते. शुद्ध पाण्यात शुद्ध पाणी मिसळले की ते सर्व एकच होते. पूर्वीचे आणि आताचे (पूर्व+अपार) सारखेच दिसते व वेगळेपणाची ओळखच उरत नाही. लाकडांच्या तुकड्यांचा आकार (काष्ठ+आकार) वेगवेगळा असतो परंतु त्यांना पेटविले की ते अग्नीस्वरूपात एकच (अभिन्न) दिसतात, त्यांचा तुकडेपणा (अविच्छिन्न) राहात नाही आणि आकारही राहात नाही, आपल्या अग्नीस्वरूपात ते विलीन होऊन जातात. त्याचप्रमाणे आत्मा एकच आहे या ज्ञानाला (आत्मा+ऐक्य+विज्ञान) आणखी दुसरे प्रमाण देऊन सिद्ध करण्याची (प्रति+पादन) जरूरी नाही. सर्व प्राण्यांमध्ये आत्मा पूर्णपणे भरलेला असतो, परंतु रूपविहीन असल्याने डोळ्यांना दिसत नाही. खोट्या कल्पनांमुळे (अध्यारोप निमित्त) प्राण्याचे चित्त सदा घोटाळ्यात पडते (भ्रमित) आणि त्यामुळे तो जन्ममरणांची दुःखे अनुभवीत सर्वदा क्षुब्ध मनःस्थितीत असतो. नाम व रूप यांची उपाधी टाकून ज्याने ईश्वराच्या सत्य स्वरूपाचे ज्ञान झाल्याची अवस्था (विशुद्ध विज्ञान+रूप) साध्य केली आहे अशा सिद्ध पुरूषाला माया बाधत नाही व तो सदा आत्मानंदात मग्न असतो. असल्या स्थितीचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे श्री साईंचे चरण आहेत व ज्यांना त्यांचे दर्शन लाभले ते लोक खरोखरच धन्य होत. चंद्र जसा पाण्यात दिसला तरी तो पाण्याच्या बाहेरच (उदक+अतीत) असतो, त्याप्रमाणे संत जरी भक्तांनी वेढलेले असले (परि+वेष्टित) तरी वस्तुतः (खरे पाहता) ते त्यांच्यापासून अगदी दूरच (अलिप्त) असतात. त्यांच्याभोवती भक्तजन जमलेले असले तरी त्यांची कोठेही आसक्ती (लोभ) नसते, त्यांची मनाची वृत्ती आत्मस्वरूपी गढलेली असते व दृष्टी कधी दुसरीकडे कोठे पहातच नसते (दृश्य+निवृत्ति सर्वदा). असे हे महान साधुसंत ज्यांच्या बोलण्याप्रमाणे (इच्छेप्रमाणे) साक्षात् ईश्वरही वागत असतो, त्यांना या जगात प्राप्त न होण्यासारखे काहीच नसते. तसेच न कळण्यासारखेदेखील काहीच नसते. उपदेश देणारे व घेणारे गुरु व शिष्य या जगात असंख्य आहेत. परंतु उपदेशाबरोबर अनुभवही देणारा गुरु क्वचितच सापडतो. (ओ. ३९-६२)

आता सुरुवातीचे हे वर्णन पुरे. श्रोते मुख्य कथा ऐकण्याला उत्सुक झालेले आहेत. तर त्यांची ऐकण्याची इच्छा पुरी होवो. मोगलाईमधील (मुसलमानी राज्यातील, म्हणजे त्याकाळच्या निजामच्या राज्यातील) नांदेड शहरी (आता महाराष्ट्राच्या मराठवाडा भागातील जिल्ह्याचे शहर) एक प्रख्यात पारशी व्यापारी होते. ते अत्यंत धार्मिक व लोकप्रिय होते. त्यांचे नाव रतनजी शापूरजी वाडिया (मिल कॉन्ट्रॅक्टर) होते. त्यांच्याकडे धन-संपत्तीचा अफाट पसारा होता. गाड्या, घोडे, शेती व राने (शिवारे) तर भरपूर होती. रतनजींचे दार सदा मोकळे (मुक्त+द्वारें) असायचे व त्यांच्या दारातून कोणीही (याचक) निराश होऊन (विन्मुख) माघारी जात नसे. बाहेरून दिसायला रात्रंदिवस असे आनंदसागरात ते डुबत असले तरी आतून रतनजी शेठजींना आवरण्यास कठीण अशा (दुर्धर) चिंतारूपी मगरीने सदा घेरले होते. हा तर ईश्वराचा सिद्धांतच दिसतो. कोणालाही निर्भेळ सौख्य नसते. कोणास काही कोणास काही चिंता पाठीशी राहतेच. कोणी म्हणेल की मीच मोठा, मीच खूप ऐश्वर्याने महान् (लाठा) आणि म्हणून मी उलटा चालू लागेन व उगाच ताठ होईन, म्हणूनच की काय काहीही व्यंग नसेल तर दृष्ट लागेल म्हणून ब्रह्मदेव (परमेष्ठी) स्वतःच्या हाताने जाणूनबुजून थोड्याशा (लव) व्यंगत्वाचे (उणेपणाचे) गालबोट त्याला लावतो असे स्पष्ट वाटते. भरपूर द्रव्य व सोने असलेले (धन+कनक+संपन्न) रतनजी शेठ आल्यागेल्यांना (मनसोक्त) अन्न खाऊ घालत, गरीबांचे दैन्य दूर करत व सदासर्वदा प्रसन्नचित्त असत. एकूण जगाच्या दृष्टीने शेटजी अत्यंत सुखात होते. परंतु निपुत्रिकाच्या (पुत्र नसलेल्याचे) संपत्तीचे सुख काही कामाचे नसते (विफला सर्वथा). एकामागून एक बारा मुलींचा पसारा असल्याने त्यांना सुखाचा वारा कोठून लाभायला आणि मन स्वस्थ कोठले राहायला? भक्तिशिवाय जर हरीचे कीर्तन असेल, ताल किंवा स्वराशिवाय जर गाणे असेल व जानव्याशिवाय (यज्ञोपविता+वीण) जर ब्राह्मण असेल तर त्याची काय शोभा! सर्व कलांमध्ये पारंगत (प्रवीण) असेल परंतु चांगल्या वाईटाचे ज्ञान नसेल, सदाचार पाळणारा असेल परंतु प्राणीमात्रांवर दया दाखवीत नसेल तर त्याची काय शोभा! कपाळावर (भाळें) गोपीचंदनाचा टिळा असेल, गळ्यात तुळशीच्या माळा भूषविल्या असतील, परंतु जीभेने साधुसंतांची टिंगल (विडंबन) चालू असेल तर त्याची काय शोभा! पश्चातापाशिवायची (अनुतापावीण) जर तीर्थयात्रा असेल, गळ्यातील हाराशिवाय जर दागिने घातले असतील, मुलाशिवाय जर गृहस्थाचे घर (सदन) असेल तर त्याची काय शोभा! "नारायण एक तरी सुपुत्र संतान देईल काय?" हाच रात्रंदिवस शेठजींचा विचार चालायचा व मन निश्चिंत (शांत) होत नव्हते. त्यामुळे शेठजी सदा दुःखी असायचे. त्यांना खाणेपिणे गोड लागत नव्हते. रात्रंदिवस मन उदास व चिंतेने भरलेले असायचे. शेठजी देवाला आळवायचे, "देवा! माझा एवढा कलंक (दोष) धुऊन टाकून मला निष्कलंक कर. माझ्या वंशाला एकतरी आधार दे व हे प्रभो! माझी लाज राख." (ओ. ६३-७९)

शेठजींची दासगणूंवर मोठी भक्ती होती. एकदा शेठजींनी मनातली ही इच्छा (जीवींचे हार्द) त्यांना सांगितली. तेव्हा ते म्हणाले, "शिरडीला जा, म्हणजे तुझा मनाचा हेतू (मन+ईप्सित) पूर्ण होईल. साईबाबांचे दर्शन घे. त्यांच्या पायांना नमस्कार करून आपली संपूर्ण गुप्त इच्छा (साद्यंत गुह्य) त्यांना सांग, म्हणजे ते तुला आशीर्वाद देतील. जा. तुझे कल्याण होईल. बाबांचे कौशल्य (विंदान) कल्पनेच्या पलीकडे (अतर्क्य) आहे. त्यांना अनन्यपणे शरण जा. तू सुखी होशील." रतनजी शेठजींना हा विचार पटला व त्यांनी शिरडीला जाण्याचा निश्चय केला. काही दिवस लोटल्यावर ते शिरडीला जाऊन पोहोचले. मशिदीत दर्शनाला गेले व साईबाबांच्या चरणांवर लोटांगण घातले. पुण्यकारक कृत्यांची साक्षात् राशीच (ढीगच) असलेल्या साई महाराजांना पाहून शेठजींचे हृदय प्रेमाने भरून आले. त्यांनी फुलांचा करंडा सोडला व त्यातून सुंदर फुलांचा (सुमन) हार काढून प्रेमपूर्वक बाबांच्या गळ्यात घातला आणि पायांशी फळफळावळांचा ढीग समर्पित केला. नंतर अत्यंत आदराने व नम्रपणाने ते बाबांच्या जवळ जाऊन बसले आणि प्रार्थना करू लागले ती ऐका. "महान संकटात पडले म्हणजे लोक आपल्या पायापाशी (निकट) येतात व आपण त्यांचे लगेच (उठाउठी) रक्षण करता, ही गोष्ट मी ऐकली म्हणून मोठी आशा (उत्कंठा) पोटाशी धरून येथवर आपल्या भेटीस आलो आहे. आपल्या चरणद्वयीं (संपुटी) अत्यंत आदराने काही मागतो. महाराज! मला परत पाठवू नका." त्यावर मग बाबा त्यांना म्हणाले, "येता येता आज येतोस! बरे, मला द्यावयाची ती दक्षिणा दे, म्हणजे तू कृतार्थ होशील." (ओ. ८०-८९)

कोणीही दर्शनाला आला व पायांना नमस्कार करू लागला की बाबा तो हिंदू, मुसलमान किंवा पारशी असला तरी त्यापाशी दक्षिणा मागत आणि ती तरी काय थोडीथोडकी! एक, दोन किंवा पाच रुपयांची रांगच (पंचकडी) लावीत. शंभर, हजार, लक्ष किंवा कोटी (कोडी) देखील स्वतःला वाटेल तितकी (स्वेच्छा परवडी) दक्षिणा मागून घेत असत, (बाबांनी कधी कोणाजवळ हजार, लक्ष किंवा कोटी रुपयांची दक्षिणा मागितली नव्हती. कधीकधी कवी प्रेमाने रंगात येऊन अतिशयोक्तीचे वर्णन करतात. म्हणून येथे मनसोक्त पुष्कळ दक्षिणा एवढाच अर्थ घ्यावयाचा आहे. अतिशयोक्तीचे आणखी उदाहरण पहा अ. ११, ओ. ९९-१००) दिली तरी आणखी आणा म्हणत व पैसे संपले म्हटले तर उसने घ्या म्हणत. जेव्हा कोठेही उसने मिळत नसत तेव्हाच मग मागणे थांबवीत. आणखी ते भक्तांना काय म्हणत? "तुम्ही मुळीच काळजी (फिकीर) करू नका. मी तुम्हाला खूप (मस्त) पैसे देईन. माझ्याजवळ तुम्ही स्वस्थपणे (निश्चिंत) बसा. या जगात कोणाचे कोणीतरी आहेच (दुनिया में किसी का कोई है). आपलेच येथे कोणी नाही (अपना तो यहां कोई नहीं है), पण आपला एकटा ईश्वर मात्र आहे (अपना अल्ला ही अल्ला है). माझ्यावर जीवापलीकडे प्रेम करील अशांचीच मला कमी (वाण) आहे. कोणी जर मला एकपट (गुण) दिले तर मी त्याला शंभरपटीने (शतपट) देतो." मोठा लक्षाधीश असला तरी साईबाबा त्याला गरीबाच्या (निर्धना) घरी दक्षिणा मागावयाला जाण्यास आज्ञा करीत. मोठा श्रीमंत (धनाढ्य) असो की भिकारी (रंक), गरीब, दुबळा अथवा निर्धन (खंक) असो, साईबाबांना एक कमी महत्त्वाचा (उणा) व दुसरा जास्त महत्त्वाचा (अधिक) असे ठाऊक नव्हते, (तो श्रीमंत माणूसदेखील) बाबांची आज्ञा शिरोधार्य मानून, अभिमान सोडून, त्या गरीबाच्या घरी जाऊन बाबांसाठी प्रार्थनापूर्वक दक्षिणेची मागणी (याचना) करीत असे. या गोष्टीचा सारांश एवढाच की दक्षिणेचे निमित्त करून बाबा आपल्या भक्तांना अहंकार टाकून नम्रता धरायला शिकवीत असत. (ओ. ९०-९९)

साधुला धन कशाला पाहिजे अशी शंका कोणास (जरूर) येईल. परंतु त्याचा नीट विचार केला तर ती मनाची शंका सहज दूर होईल. साईबाबांच्या सर्व इच्छा पूर्ण झालेल्या होत्या (पूर्णकाम) तर त्यांना दक्षिणा कशाला हवी? भक्तांकडून जे पैसे (दाम) मागतात ते मग निष्काम (कसलीही इच्छा नसणारे) कसे म्हणावयाचे? ज्यांच्या दृष्टीने गारा (आकाशातून पावसांच्या सरीबरोबर पडणारे बर्फाचे तुकडे) आणि हीरा (पांढऱ्या रंगाचे मौल्यवान रत्न) अथवा ताम्र-नाणे (तांब्याचे नाणे) आणि स्वर्ण-मोहरा (सोन्याचे नाणे) ही दोन्ही एकाच किंमतीत मोजली जातात ते मग आपला हात (पैसे) मागण्यासाठी का बरे पसरतात? पोट भरण्यासाठी भिक्षा मागतात व वैराग्याची दीक्षा घेतलेली आहे, मग अशा निरपेक्ष विरक्ताला दक्षिणेची अपेक्षा का बरे असावी? ज्यांच्या दारी अष्टसिद्धी (अणिमा, लघिमा, प्राप्ती, प्राकाम्य, महिमा, इशित्व, वशिता व कामावसायिता) हात जोडून सदा उभ्या राहतात, ज्यांची आज्ञा पाळावयाला कुबेराचे नऊ प्रकारचे खजिने (महापद्म, पद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील व खर्व) तत्पर असतात, त्यांनी द्रव्यासाठी लाचारी का बरे पत्करावी? संसारसुखाला (ऐहिकाला) लाथ मारून स्वर्गसुखाकडे (आमुष्मिका) ढुंकूनही न पाहणारे असे जे, आपले हित कशात आहे ते जाणणारे (सम्यक्+दर्शी) विरक्त (भोगेच्छेपासून पराङ्मुख) लोक त्यांना धन कशाला पाहिजे? जे संत, साधु व सज्जन असून ज्यांचे लक्ष आपली कीर्ति सदा चांगली राहावी याकडे असते (उत्तम+श्लोक+परायण) व ज्यांचे जीवन भक्तांच्या कल्याणाकरिताच असते त्यांनी धन कशाला गोळा करावे? साधूंनी दक्षिणा कशाला मागावी? त्यांचे मन सदा निरिच्छ (कसलीही इच्छा नसलेले) असावे. साईबाबा फकीर झाले आहेत तरी त्यांना लोभ सुटत नाही. सदा पैशाच्या मागे लागतात. पहिल्या दर्शनाला दक्षिणा घेतात, दुसऱ्या दर्शनालाही दक्षिणा मागतात आणि निरोप घेतानादेखील "आणा दक्षिणा" म्हणतात. मिनिटा मिनिटाला हे काय! (पूजाविधीत नैवेद्य

दाखविल्यानंतर) आधी भोजनानंतरचे आचमन घेण्यासाठी पिण्याचे पाणी देतात (पानीय उत्तर+आपोशन), पुढे हात व तोंड धुण्यासाठी पाणी देतात (हस्तमुख प्रक्षालन); हाताला सुगंध लावले जाते (कर+उद्वर्तन) आणि पानाचा विडा (तांबुल दान) दिला जातो आणि सर्वांच्या शेवटी दक्षिणा दिली जाते. परंतु बाबांचा क्रम विलक्षणच असे. चंदनाचे गंध लावताच किंवा अक्षता वगैरेंनी भूषविताच (अक्षता+आदि+अलंकरण) ते दक्षिणा देण्याच्या विधीची अपेक्षा करीत असत (कांक्षिती) आणि सुरुवातीच्या प्रार्थनेचा (पूर्व+आराधना) आरंभ करताच ते दक्षिणा (आधी) मागत असत. त्यामुळे "ॐ तत् सत् ब्रह्मार्पणं अस्तु" हा दक्षिणा देण्याचा मंत्र त्याच क्षणी म्हणावा लागे. (ओ. १००-१११)

परंतु या शंकेचे निरसन करावयाला फार प्रयत्न करावा लागणार नाही. क्षणभर लक्ष द्याल तर समाधान पावाल. धनाचा जो संग्रह (संचय) करावयाचा त्याचा उद्देश आपल्या हातून धर्म घडावा (दानधर्मासारखी परोपकारी कृत्ये करता यावी) हा आहे, परंतु लोक ते धन क्षुल्लक रतिसुख आणि इतर ऐहिक सुखे भोगण्याप्रित्यर्थ वाटेल तसे खर्च करतात. खरे पाहता पैसा गाठी असला म्हणजे (ते कमविण्याची विवंचना नसल्याने) शास्त्रांचा अभ्यास, धर्मकार्ये व दानधर्म निश्चिंतपणे करता येतो (धनापासाव धर्म घडे) आणि त्यामुळे परमात्म्याविषयीचे ज्ञान जोडता येते (धर्मापासाव ज्ञान जोडे). असा हा स्वतःचा पैसा (स्व+अर्थ) परमेश्वराकडे नेणाऱ्या मार्गावर (परम+अर्थी) आपणाला चढवितो आणि मग मनाला सुखशांती लाभते (आतुडे समाधान). सुरुवातीला पुष्कळ दिवसांपर्यंत बाबा काहीही घेत नव्हते. जळक्या काड्या गोळा करीत व त्याच खिशात भरीत असत. भक्त असो की अभक्त (त्यांची भक्ती न करणारा) असो, कोणापाशी काहीच मागत नसत. एखाद्याने जर तांब्याचा पै पैसा (दिडकी दुगाणी) ठेवलाच तर त्याचा तंबाखू (तमाखू) किंवा तेल विकत आणीत. तंबाखूचे प्रेम त्यांना फार होते व विडी किंवा चिलीमपण ते ओढीत असत. चिलमीच्या ओढण्याला सीमाच नव्हती. बहुतेक ती सदा पेटलेलीच (निर्धूम) असायची. पुढे कोणाच्या मनात आले की संताच्या दर्शनाला रिकाम्या हाताने दक्षिणेशिवाय कसे जावे म्हणून ते दक्षिणा घेऊन जाऊ लागले. एखाद्याने (एक) पैसा दिला तर ते खिशात घालीत असत. परंतु जर ढबू पैसा (दोन पैशाचे नाणे) कोणी ठेवला तर जशाचा तसा परत करीत असत. असा क्रम खूप दिवस चालला. परंतु पुढे काही काळानंतर साईबाबांचे माहात्म्य वाढले, भक्तांचे थवेच्या थवे येऊ लागले व विधिपूर्वक त्यांचे पूजन चालू झाले. पूजेची पूर्णता (साङ्गता) सोने, फुले व दक्षिणा दिल्याशिवाय होत नसते हा नित्य पूजेचा विधीक्रम करणाऱ्यांना शास्त्राच्या आधारासह (प्रमाण) ठाऊक होता. राजाला अभिषेकाच्या वेळी पाणी शिंपडताना (सिंचना) किंवा पाद्य-पूजा करताना, पूजा करणारे भेट (उपायना) आणतात. तसेच गुरुच्या पूजेलाही दक्षिणा आणली जाते. 'उच्चादिवि दक्षिणावंत' (दक्षिणा देणारे उच्च पदाला, म्हणजे स्वर्गलोकाला पोहोचतात), 'हिरण्यदा अमृतत्वं' (सुवर्णदान किंवा हिरण्य नामक नाणी देणाऱ्यांना मोक्ष प्राप्त होतो) व **हेमदाता शुद्धिमंत'** (सोने देणाऱ्याचे चित्त शुद्ध होते) असे वेदभागात सांगितले आहे. (दक्षिणा सूक्त, ऋग्वेद, मं. १०, सूक्त १०७-२) गंध लावल्याने शुद्ध पावित्र्य (सौमंगल्य) प्राप्त होते, अक्षता (अभिमंत्रित न भंगलेले शाबूत तांदूळ) वाहिल्याने आयुष्याची वाढ (वर्धन) होते, फुले व पानाचा विडा अर्पण केल्याने संपत्ती व ऐश्वर्य प्राप्त होते आणि दक्षिणा दिल्याने खूप द्रव्याची (बहुधनता) प्राप्ती होते. **(गंधाः पांतु सौमंगल्यं चास्तु। अक्षताः पांतु आयुष्यमस्तु। पुष्प पोतु सौश्रेय समस्तु। तांबुल पातु ऐश्वर्यमस्तु। दक्षिणाः पांतु बहुदेयं चास्तु।)** पूजेच्या साधनात जसे गंध, अक्षता, फुले व विडा हे महत्त्वाचे तसेच दक्षिणा व सोन्याचे फूलही महत्त्वाचे असून त्यामुळे बहुधनतेचे (पुष्कळ द्रव्याचे) फळ वाटचास येते (वितरते). देवाच्या पूजेच्या प्रसंगी जिच्या पूर्णतेसाठी जशी दक्षिणा लागते तशीच व्यवहारात (जनी) व्रतांच्या उद्यापनांच्या (समाप्तीच्या वेळी करावयाचे विधी) प्रसंगी व वायनदानी (काही व्रतानिमित्त ब्राह्मणांना किंवा सुवासिनींना फळे, मिठाई वगैरेंची देणगी देताना) सुवर्ण (हिरण्य) द्यावे लागते. जगाचा हा घेण्यादेण्याचा सगळा व्यवहार (घडामोड) रोख पैशावरच केला जातो. आपली नातलगांत व मित्रांत अब्रू (प्रतिष्ठा) कमी होऊ नये म्हणून लोक अशा प्रसंगी यथायोग्य पैसा खर्च करून ती कायम ठेवतात (अब्रूनुकसानीची फेड ही फेडितात पैशाने). **'हिरण्यगर्भ-गर्भस्थं'** इत्यादी मंत्र **(हिरण्यगर्भगर्भस्थं हेमबीजं विभावसोः। अनंतपुण्यफलदमतः शान्ति प्रयच्छ मे॥)** उच्चारून देवपूजेला जर दक्षिणा मान्य (संमत) आहे तर ती मग संतपूजनाला का नको? (ओ. ११२-१२८)

संतांच्या दर्शनाला जाताना आपापल्या ज्ञानाप्रमाणे कोणाच्या काय कोणाच्या काय मनात कल्पना असतात! सर्वांचे एकमत जुळणे कठीणच असते. कोणाच्या मनात भक्तीचा भाव असतो, तर कोणी संताची पारख करावयाला जातो, तर कोणी म्हणतो, आपल्या मनातले सांगेल तोच या जगात खरा संत होय! कोणी दीर्घ आयुष्य मागतात, तर कोणी हत्ती, सोने, संपत्ती व मालमत्ता मागतात. कोणी पुत्र, पौत्र वगैरे मागतात, तर कोणी कधीही कमी न होणारी (अखंडित) सत्ता मागतात. बाबांची शैली खरोखरीच अगाध आणि आश्चर्यकारक होती. कोणी गृहस्थ त्यांची चेष्टा किंवा बदनामी (कुटाळी) करण्याच्या हेतूने जरी गेला असला तरी त्याची ती दुष्ट बुद्धी नष्ट (होळी) होऊन जात असे व तो त्यांच्या चरणकमळी रमून जात असे. हेही भाग्य जर त्याच्या प्रारब्धात (संचिती) नसेल तर त्याच्या मनाला पश्चात्ताप तरी (अनुताप) होत असे आणि त्याचा अहंकार खात्रीने गळून जाऊन बाबांचा खरा व निश्चित बोध तो अनुभवत असे (दृढप्रचिती पावत). हे सर्वसामान्य (प्राकृत) भक्त सदा

सर्वदा संसारात आसक्त होते. त्यांची मने दक्षिणा देऊन शुद्ध व्हावीत हीच बाबांची इच्छा होती. **''यज्ञेन, दानेन, तपसा''** हे वेदवाक्य आत्मज्ञान प्राप्त करून घेण्यास उत्सुक असणाऱ्यांना दक्षिणा देण्याच्या साधनाची युक्ती स्पष्ट शब्दात सांगते. भक्त स्वार्थी (प्रपंचातील हित साधणारा) असो की परमार्थी (परमार्थ साध्य करण्याची इच्छा करणारा) असो दोघांनीही इच्छित प्राप्तीसाठी व आपल्या कल्याणासाठी आपल्या गुरुला दक्षिणा द्यायला हवी. (ओ. १२९-१३६)

ब्रह्मदेवानेदेखील देव, दैत्य व मानव ह्या त्यांच्या तीन बालकांना त्यांनी ब्रह्मचर्य संपल्यावर उपदेश मागितला असताना हेच सांगितले. 'द' या एक अक्षराचा उपदेश केला व त्यावरून ते काय समजले हे विचारून तो पक्काही केला. खरोखर गुरु व शिष्य यांचा खेळ विलक्षण (अभिनव) असतो. 'दान्त व्हावे (संयम करावा)' असे देव समजले, 'दया करावी' असे असुर (दैत्य) समजले व 'दान करावे' असे मनुष्य समजला आणि ब्रह्मदेव (प्रजापति) हे ऐकून 'बरोबर आहे. तुमचे कल्याण होवो' असे म्हणाले. हे देव दुसरे कोणी नसून मानवच असतात. फक्त स्वभावाने ते वेगळे असतात. जे उत्तम गुण युक्त असतात त्यांना देव म्हणतात. असुरदेखील मानवच असतात पण ते हिंसा करणारे, दुष्ट व क्रूर असतात. मानवाला महाभयंकर लोभ गांजत असतो. असे मानवाचेच तीन प्रकार आहेत. लोभाने ग्रासलेल्या मानवाला लोभरूपी खड्ड्यातून (गर्तेतून) बाहेर काढण्याकरिता कृपेचा सागर असलेले श्री साईनाथ भक्तांच्या कल्याणाच्या इच्छेने त्यांचा हात वर ओढून घेत असत. तैत्तिरीय उपनिषदातील (पहिल्या वल्लीच्या) अकराव्या अनुवाकात दानाचे अनेक प्रकार सांगितले आहेत. त्यातील प्रत्येक प्रकार नीट ऐका. (**श्रद्धया देयम्। अश्रद्धया अदेयम्। श्रिया देयम्। ह्रिया देयम्। भिया देयम्। संविदा देयम्।**) जे द्यावयाचे ते नेहमी श्रद्धेपूर्वक द्यावे. श्रद्धेशिवाय दिलेले दान पावत नाही. राजाच्या आज्ञेमुळे, शास्त्रात सांगितले म्हणून किंवा भीतीने, लाजेने सुद्धा काहीतरी द्यावे. विवाह वगैरे कार्यप्रसंग जगात असतात, तेथेही भेटीच्या वस्तु किंवा रोख पैसे (आहेर) द्यावे लागतात. ते देऊन मित्रत्वाचे कर्तव्य सांभाळावे अशी लोकव्यवहाराची शिकवण आहे. (ओ. १३७-१४५)

साईबाबादेखील 'द' या अक्षराने भक्तांच्या कल्याणासाठी त्यांच्याकडून हेच मागत असत. ते म्हणत, ''दया करा, दान द्या व दान्त व्हा (इंद्रियांचे दमन करा). म्हणजे अत्यंत सुख पावाल.'' अदान्तता (अजितेंद्रियता), अदानता (लोभीपणा, चिक्कूपणा) व अदयालुता (निर्दयपणा) ह्या तीन दोषांचा नाश करावयासाठी हा एक अक्षराचा लहानसा (स्वल्प) उपाय आपल्या शिष्यांसाठी गुरुमहाराज योजीत होते. काम, क्रोध व लोभ हे आत्मोन्नतीसाठी अशुभ आहेत (चांगले नाहीत). त्यांच्यावर विजय मिळविणे फार कठीण आहे, म्हणून हा सोपा उपाय सांगितला. हा ('द'काराचा एकाक्षरी उपाय) जसा श्रुतीत (बृहदारण्यक उपनिषद, अध्याय ५, ब्राह्मण २) तसाच स्मृतीतही (श्रीमद्‌भगवद्गीता, अ. १६, श्लो. २१) सांगितला आहे व तेथेही याच उपदेशाला दुजोरा दिलेला आहे. श्रोत्यांना तो नीट कळावा म्हणून तिचा उतारा (अवतरण) मी खाली देत आहे:

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः।**
**कामःक्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत्॥**

–श्रीमद्भगवद्गीता, अ. १६, श्लो. २१

काम, क्रोध व लोभ ही नरकाची तीन दारेच आहेत. त्याच्या पायी आपला नाशच ठरलेला, म्हणून त्यांना निश्चितपणे सोडून द्यावे. श्री साई समर्थ अत्यंत दयाळू आहेत. भक्तांच्या कल्याणासाठी त्यांच्याकडे ते दक्षिणा मागत होते आणि त्यागाचे शिक्षण देत होते. दक्षिणेची तर काय किंमत! गुरुचे वचन पाळायला जो आपला प्राणदेखील द्यावयास तयार नाही त्याचा परमार्थ काय कामाचा! खरेच, भक्तांच्या कल्याणाशिवाय बाबांना दक्षिणेचे काय कारण असणार! त्यांचे स्वतःचे जीवन काही दक्षिणेवर अवलंबून नव्हते. पोट भरण्यासाठी तर ते भिक्षा मागत होते. मग दक्षिणा मागण्यामागे त्यांचा कोणता स्वार्थ असणार! दक्षिणेचे दान देऊन आपल्या भक्तांचे चित्त शुद्ध व्हावे हाच त्यांचा हेतू होता. सारांश, वर दर्शविलेल्या वेदवचनानुसार दक्षिणेचे दान आधी घडवून आणल्याशिवाय गुरुचे पूजन संपूर्ण होत नसते. (ओ. १४६-१५५)

आता हा दक्षिणा ग्रंथ पुरे. त्याच्या चर्चेचा अर्थ स्पष्ट झाला. बाबांना कसली आशा नव्हती किंवा स्वार्थ नव्हता. फक्त भक्तांच्या कल्याणासाठी ते दक्षिणा मागत होते. तरी आता पुढचा कथाभाग संपूर्णतया (यथासांग) निवेदन करू या. त्यातील रतनजी-दक्षिणा-प्रसंग आणि साईबाबांचे छानसे (चांग) कौतुक ऐकावे. श्रोत्यांनी हे अद्‌भुत कथानक पूर्ण सद्‌भावपूर्वक ऐकावे व साईबाबांचे स्वरूप कसे व्यापक आणि अलौकिक आहे ते पहावे. शेठजींकडून दक्षिणा मागताना साईबाबांनी पूर्वीचा वृत्तांत सांगितला. परंतु तो शेठजींच्या चित्ताला आठवत नव्हता, म्हणून त्यांना आश्चर्य वाटले. ''तू मला तीन रुपये चौदा आणे (१६ आणे = १ रुपया) दिले होतेस ते मला ठाऊक आहे. आता बाकी राहिलेले जे तू आणले आहेस त्याची मला दक्षिणा दे.'' रतनजी शेठजींना बाबांचे हे पहिलेच दर्शन होते. तेव्हा बाबांचे हे बोलणे ऐकून ते आश्चर्यचकित झाले व आठवू लागले. आपण पूर्वी शिरडीत कधी आलो नाही किंवा कोणाबरोबर काही पाठविले नाही, असे असता साईमहाराज जे म्हणतात ते आश्चर्यकारक नाही का? असे कधी (शेठजींच्या आठवणीत) घडलेच नसल्याने ते मनात फार अवघडून गेले. त्यांनी बाबांना दक्षिणा दिली व नमस्कार केला. परंतु ते कोडे (गूढ प्रश्न) काही त्यांना उलगडले नाही (न+उलगडे). शेवटी ते (कोडे)

तसेच राहून गेले. शेठजींनी आपल्या येण्याचा हेतू सांगितला, पुन्हा पायी लोटांगण घातले व हात जोडून बसले. शेठजी मनात खूप समाधान पावले व म्हणाले, "बाबा! बरे झाले. आज आपल्या पायांचे दर्शन झाले. माझे पूर्वजन्मीचे भाग्य उदयाला आले. मी दुर्दैवी व मला फारसे ज्ञान नाही. मला पूजा-अर्चा व यज्ञ ठाऊक नाही. नशिबाने त्रिकालज्ञानी अशा आपल्यासारख्या सूज्ञ संताचे दर्शन (प्राज्ञ+दर्शन) झाले. आपणाला माझी चिंता ठाऊकच आहे. ती कृपावंत होऊन आपण दूर करा व हे दयाळा! या अनन्य भक्ताला पायापासून दूर लोटू नका." (हे ऐकून) श्री साईबाबांना शेठजींविषयी दया उत्पन्न झाली व ते म्हणाले, "उगाच काळजी करू नकोस. तुझ्या दुर्भाग्याला आता उतरती कळा लागली समज." बाबांनी शेठजींच्या हातावर उदीचा प्रसाद दिला, डोक्यावर कृपेचा हात ठेवला आणि "मनाची मुराद (इच्छा) पुरवील अल्ला" असा आशीर्वादही दिला. मग रतनजी शेठजींनी बाबांची आज्ञा घेतली व नांदेडला परत येऊन जे जे जसे घडले तसे सविस्तर दासगणूंना सांगितले, "यथायोग्य दर्शन झाले, मन भरपूर आनंदित झाले व प्रसादपूर्वक आश्वासन व आशीर्वादही मिळाला. यथास्थित सर्व झाले, परंतु एक गोष्ट मात्र मला समजली नाही. तीन रुपये चौदा आणे तू मला दिलेस ते मला ठाऊक आहे, असे बाबा म्हणाले. त्याचा अर्थ मला कळला नाही. तुम्ही तरी तो सारा स्पष्ट करून सांगा. कुठले रुपये, कुठले आणे व हे देणे तरी पूर्वी कुठून घडले? शिरडीला माझे हे पहिल्यांदाच जाणे झाले आहे. यातले तात्पर्य (इंगित) मला काहीच कळत नाही. मला याचा काहीच उलगडा होत नाही. हे सर्व मला अत्यंत गूढ व न समजणारे कोडेच वाटते. आपणाला तरी ते उलगडते का?" (ओ. १५६-१७५)

दासगणू विचार करू लागले. हा तर एक चमत्कारच झाला. काय बरे याचा अर्थ असावा? त्यांच्या मनाचा काहीच निश्चय होत नव्हता. मग खूप विचार केल्यावर त्यांच्या मनाला एक अवलियाची (मुसलमान संताची) मूर्ती आठवली, ज्यांना लोक मौलीसाहेब म्हणत असत. जातीने ते मुसलमान होते. परंतु त्यांचे वागणे व दिनचर्या संतासारखी होती. हमालीचा धंदा करून ते दैव ठेवील त्याप्रमाणे राहत होते. त्यांचे चरित्र जर सविस्तर सांगू लागलो तर या ग्रंथात विषयांतर होईल. तशी मौलीसाहेबांची चरित्रकथा नांदेड येथे सर्वांनाच ठाऊक आहे. रतनजी शेठजींचे शिरडीला जाणे ठरल्यावर या मौलीसाहेबांची फेरी आपण होऊन सहज त्यांच्या घरी झाली. त्यांचे दोघांचे एकमेकांवर पुष्कळ (अपरंपार) प्रेम होते. शेठजींनी मौलीसाहेबांना उपचारपूर्वक फुलांचा हार व फलपान अर्पण केलं आणि अचानक स्फूर्ती झाल्याने छोटासा खाना (जेवण) पण दिला. गणुदासांना त्याक्षणी त्यानिमित्त झालेल्या खर्चाची आठवण झाली. म्हणून त्यांनी खर्चाची यादी मागविली, पईनपई (३ पई = १ जुना पैसा) सर्व धरली आणि एकंदर बेरीज केली. बेरीज अगदी बरोबर तीन रुपये चौदा आणे झाली, जास्त नाही किंवा कमीही नाही. बाबांनी त्याची पावती द्यावी या बाबांच्या अष्टपैलूपणाचे सर्वांना आश्चर्य वाटले. साईबाबा ज्ञानाचे साक्षात राशी (ढीग) होते. मशिदीत बसून कुठल्याही देशात घडणारे भूत, भविष्य व वर्तमान ते जाणत होते. साईसमर्थांची सर्व भूतमात्रांशी एकात्मता असल्याशिवाय का हा प्रकार अनुभवता येईल किंवा दुसऱ्याला सांगता येईल! नांदेड शिरडीपासून कितीतरी दूर व दोन्ही ठिकाणांमध्ये अंतरही बरेच. तसेच हे दोन्ही संत एकमेकांना न ओळखणारे. मग साईबाबांना ही तार (तारायंत्राने पाठविलेली बातमी Telegram) यावी कशी? साईमहाराज तो मी एक आणि मौलीबुवा तो आणखी दुसरा कोणी, असे भेदबुद्धीचे ज्ञान किंवा वेगळेपणा दोघांमध्ये नव्हता. मौलीबुवांचा जो आत्मा तोच सर्वांच्या हृदयातील आत्मा. परंतु या एकात्म धर्माच्या वर्माला जाणेल तो धन्य होय! बाहेरून शरीराने जरी ते दोघे वेगळे होते तरी आतून हृदयामध्ये ते दोघे नेहमी जोडलेले (नित्य+युक्त) होते. "ते दोघे" हे बोलणेच योग्य नव्हे, कारण ते कधीही वेगळे नव्हते. त्या दोघांचे एकच ज्ञान, एकच प्राण, एकच उद्देश होता आणि दोघेही सारख्या वृत्तीने पूर्ण चैतन्ययुक्त होते. शिरडी व नांदेड यांत खूप अंतर असले तरी दोघांचा अंत (मन) एकच होता, त्यांचा एकच प्राण व एकच देह होता. म्हणूनच ही एकमेकांना तार (त्वरित बातमी) मिळाली. साधुसंतांचे हे किती नवल! त्यांच्या तारायंत्रांना तारा नसतात, तरी या पृथ्वीवर कोठे काहीही घडले तरी त्यांना ते ठाऊक असते. (ओ. १७६-१९३)

असो. पुढे योग्य काळ लोटला व रतनजींना देव पावला. त्यांच्या पत्नीला गर्भ राहिला आणि त्यांच्या आशारूपी वृक्षाला पालवी फुटली. योग्य वेळी त्यांचे कुटुंब बाळंत झाले व बाबांचे आशीर्वचन खरे झाले. पुत्ररत्न जन्माला आल्याने रतनजी आनंदित झाले. पुष्कळ वर्षे दुष्काळ असावा आणि अचानक पाऊस पडावा त्याप्रमाणे पुत्रसंतान प्राप्तीमुळे रतनजींना पूर्ण समाधान लाभले. तो वंशरूपी वेल जो एकदा फुलला तो यथाक्रम वाढत गेला, मुलामुलींनी चहूकडून भरला व रतनजी सुखी झाले. यानंतरही ते साईबाबांच्या दर्शनाला जात असत व त्यांचे आशीर्वाद पावत असत. रतनजींच्या मनाच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या व ते मनाने संतुष्ट झाले. वसंतऋतूत आंब्याला जरी खूप फळे आली तरी ती सर्वच फळे पिकत नाहीत. त्याप्रमाणे रतनजींच्या बारा मुलांत चारच जिवंत राहिली व ती सध्या सुखाने नांदत आहेत. नशीबाने जे जे घडेल त्यातच सुख मानावे अशा गोड स्वभावाचे रतनजी तिळभरही दुःखी झाले नाही. (ओ. १९४-२००)

आता पुढील कथेचे सार सांगतो. हे सर्व स्थावर व जंगम साईंनी व्यापिलेले आहे. याचा खरोखर अनुभव कोणीही

कोठेही स्वस्थ बसून घ्यावा. ठाणे शहरचा एक गरीब चोळकर आडनावाचा लाचार (दीन) गृहस्थ होता. त्याच्या भावपूर्ण भक्तीवर गुरुश्रेष्ठ कसे प्रसन्न झाले, ज्याने साईबाबांना पूर्वी कधी पाहिलेही नव्हते तरी त्यांना त्याने कसा नवस केला, त्याच्या मनाची इच्छा कशी पूर्ण झाली व त्याला काय अनुभव आला, हे सर्व आता ऐका. प्रेमाशिवाय भजन काय कामाचे? अर्थ समजल्याशिवाय पोथी वाचून काय उपयोग? आणि भावभक्तिशिवाय देव कुठला लाभायला? ती सर्व फुकटची मेहनतच. कुंकवाच्या टिळ्याशिवाय कपाळ (भाळ) व अनुभवाशिवाय ज्ञान व्यर्थच असते. हे निव्वळ पुस्तकी विद्येचे बोल नाहीत. अनुभव घेऊन श्रोत्यांनी त्यांची किंमत करावी. (ओ. २०१-२०५)

हा साईंच्या लीलांचा ग्रंथ कशाकरिता व त्याचा संबंध काय हे मला ठाऊक नाही. माझ्याकडून साईबाबांनी तो लिहविला. त्यांनाच त्याचा हेतू माहीत. ग्रंथ लिहावयाला अधिकारी व्यक्ती लागते. मी तर फक्त साईबाबांची चाकरी करतो व त्यांच्या आज्ञेने हे दफ्तर सांभाळतो. श्रोते तहानेने व्याकूळ झालेले (तृषा+कीर्ण) चातक आहेत व साईसमर्थ स्वानंदाचे मेघ आहेत. त्यांची तहान भागवायला ते अनंत कथारूपी पाण्याचा (जीवन) वर्षाव करीत आहेत. त्यांच्या प्रभावाने ही माझी वाणी त्यांच्या चरित्राचे वर्णन करीत आहे. त्यांच्या चरणाच्या धुळीच्या कणात हे माझे शरीर लोळण घेवो. या माझ्या वाणीला प्रेरणा देणारे तेच. त्यांच्याच पायीं माझ्या चंचल मनाला स्थिरता लाभो. जसे हे शरीराचे (कायिक) व वाणीचे (वाचिक) भजन तसेच माझे मानसिक भजनही मला अखंड सुखदायक होवो. मी तर साईबाबांचा दीन निरोप्या (पाईक) आहे. चरित्र बोलणारे व बोलविणारे जरी साईबाबा स्वतःच संपूर्णपणे नटले असले तरी श्रोता काय वेगळा आहे? तोसुद्धा साईबाबांहून दूरचा (परता) नाही. दिसायला हा केवळ आयुष्याचा साधा आचरणक्रम (चरित्र) दिसतो, परंतु हा सर्व साईबाबांचा खेळ आहे. त्यांनी स्वतःच प्रेमळ खिलाडी होऊन ही प्रबळ लीला मांडिली आहे. साईबाबांचे चरित्र अगाध आहे. भक्तांना विचित्र अनुभव दाखवून, मला निमित्तमात्र करून, आपल्या भक्तसमूहाला त्यांनी संतुष्ट केले. हे नुसते चरित्रच नाही तर सुखाचा ठेवा (भांडार) आहे व श्रेष्ठ मोक्षाची मिठाई (परम+अमृताचा मेवा) आहे. ज्याचे खास वेगळे भाग्य असेल त्यानेच याचे भक्तिभावाने सेवन करावे. गुरुकृपेच्या महिम्याची व नवलाची आम्हा भक्तांना आठवण राहावी म्हणून भक्तांच्या विश्रामासाठी हे ग्रंथ रचण्याचे परिश्रम घेतले. हे चरित्र जर आवडीने वाचले तर भक्तांचा ऐकण्याचा आनंद वाढेल (उल्हसेल), त्यातील कथा पुन्हा पुन्हा वाचल्या (अनुवादे) व त्याप्रमाणे आचरण केले (अनुवृत्ति) तर भक्ती व प्रेम वाढेल. हे चरित्र जर रात्रंदिवस ऐकले तर मायेच्या मोहाचे बंधन तुटेल, त्रिपुटीचे (ध्याता, ध्यान व ध्येय) भान वितळून जाईल व श्रोतेजन सुखसंपन्न होतील. हेमाडपंत बाबांचे चरण पकडून त्यांना अनन्यपणे शरण जातात. एकही क्षण थांबू शकत नाहीत (विसंवू न पवे) व चरणांवर अखंड लोटांगण घालतात. (ओ. २०६-२१९)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या, भक्त हेमाडपंत यांनी रचलेल्या श्री साई समर्थ यांच्या सत्यचरित्राचा **'रतनजी-साई समागमः'** (नांदेडच्या रतनजी शेठचा साईबाबांशी संबंध) नावाचा चवदावा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्‌गुरु साईनाथांना अर्पण असो. सर्व मंगल असो.**

## अध्याय १४ ची आणखी टीका

वरवर पाहता या अध्यायात हेमाडपंतांनी रतनजी पारसीची एकच कथा सांगितली आहे. परंतु त्याबरोबरच आणखी किती तरी बोधपर गोष्टींचे विवेचन केले आहे:

सुरुवातीला मागील अध्याय ८ प्रमाणे नरजन्माचे महिमान पुन्हा सांगून संसाराची अनित्यता ठसविली आहे:

**मेघमंडळीं विद्युल्लेखा।**
**संसार हा चंचल तिजसारिखा।**
**एथें कालाहिग्रस्त लोकां।**
**सुखाची घटिका दुर्मिळ॥२१॥**

**माता पिता भगिनी भ्राता। दारा पुत्र सुता चुलता।**
**नदीप्रवाहीं काष्ठें वाहतां। एकत्र मिळतात तैसे हे॥२२॥**

**दिसलीं क्षण एक एकवट। लाटेसरसी फाटाफूट।**
**होऊनि पडे जैं ताटातूट। जुळेना तो घाट पुनश्च॥२३॥**

**प्राणी जेव्हां जन्मास आला।**
**तेव्हांचि मृत्युपंथा लागला।**
**मग आज उद्यां कीं परवांला।**
**विश्वासला नर फसला तो॥२५॥**

म्हणून माणसाने या जन्मीं आत्महित साधून घ्यावे:

**व्यवहारीं पाऊल ठेवितां चौकस।**
**परमार्थ पावेल अप्रयास।**
**म्हणूनि प्रपंचीं नसावा आळस।**
**पुरुषार्थीं उदास असूं नये॥२७॥**

आणि त्यासाठी प्रेमाने नित्य साईकथा ऐकण्याचा उपदेश करून त्याचे फळही ते सांगतात:

**नित्य पडतां या कथा श्रवणीं।**
**साई दिसेल नित्य नयनीं।**
**मनीं ध्यानीं दिवारजनीं। स्मरणीं चिंतनीं राहील॥३२॥**

दिसूं लागेल जागृतिस्वप्नीं।
आसनीं शयनीं आणि भोजनीं।
सर्वेही येईल गमनागमनीं। जनीं वनीं निरंतर।।३३।।

ऐसा येतां निदिध्यासनीं। मन पावेल स्थिति उन्मनी।
ऐसें होऊं लागतां अनुदिनीं।
चित्त चैतन्यीं समरसेल।।३४।।

यानंतर हेमाडपंतांनी 'जे सत्तत्त्वही निजपिंडीं। तेंचि कीं अखिल ब्रह्मांडी।।' हे महान तत्त्व (पहा, छांदोग्य उपनिषदातील महावाक्य 'तत्त्वमसि', म्हणजे ते ब्रह्म तूच आहेस) सांगून एकत्व व नानात्व याचे सुंदर स्पष्टीकरणासह विवेचन केले आहे:

नानात्वाचें केलिया धारण। जन्ममरण-परंपरा।।४०।।
नानात्व स्थापणारी बुद्धि। अविद्याच जाणावी त्रिशुद्धी।

म्हणून हेमाडपंत एकत्वाची व्याख्या सांगतात:

मी वेगळा जन वेगळे। ऐसें न जया कांहीं निराळें।
अखंडैकरसपूर्ण जें भरलें। दुजें न उरलें तयातें।।४६।।

मीच एक अवघा पाहीं। मजवेण रिता ठाव नाहीं।
व्यापूनि अशेष दिशा दाही। नाहींच कांहीं मदन्य।।४८।।

आणि मग उपदेश करतात:

हेचि भावना दृढ धरावी। माया भूल दूरी सारावी।
मजवीण नाहीं वस्तु परावी। आवरावी निजदृष्टि।।४९।।

व मग म्हणतात:

ऐसिया स्थितीचें उदाहरण। मूर्तिमंत श्रीसाईचे चरण।
भाग्यें लाभलें जयां दर्शन। धन्य धन्य जन ऐसे।।५८।।

नांदेडच्या रतनजीच्या कथेत याचीच प्रचिती येते. साईबाबांचे असे एकत्व असल्याशिवायच का त्यांना रतनजीच्या येण्याची आधीच कल्पना होती **(येतां येतां आज येसी।।८९।।)**! रतनजींनी आपल्या मनातील पुत्रप्राप्तीची इच्छा तोंडाने न सांगताही **(आपण जाणतां माझी चिंता। करा दूर ती कृपावंता।।१६७।।)** बाबांनी त्यांना **'मनाची मुराद पुरवील अल्ला'।।१६९।।** असा आशीर्वाद दिला आणि चार मुलांचे सुख दिले. तसेच रतनजींनी पायी नमस्कार केल्यावर **'तीन रुपये चौदा आणे। त्वां मज दिधले ते मी जाणें। बाकी जे आणिले मजकारणें। ते मज दक्षिणे देईं गा'।।१६०।।** असे म्हणून नांदेडच्या मौलीबुवांना शेठजीने दिलेल्या छोट्या खान्याची आपणाला तंतोतंत जाण असल्याचे जे बाबांनी सुचविले तेही त्यांची त्या संताशी एकात्मता होती म्हणूनच:

साई महाराज तो मी एक। मौलीबुवा कोणी आणिक।
भेदबुद्धीचा हा विवेक। नाहीं अनेकत्व उभयांत।।१८८।।

त्या दोघांचें एकज्ञान। एकप्राण- एक अनुसंधान।
दोघेही एक चैतन्यघन। समसमान वृत्तीनें।।१९१।।

रतनजीची ही कथाही इतर कथांपेक्षा विशेष प्रकारची आहे. प्रथम म्हणजे ती एका अगदी वेगळ्या धर्माच्या माणसाची आहे. साईबाबांचे हिन्दू व मुसलमान भक्त पूर्वीपासूनच अनेक होते. आता पारशी भक्ताची कथा सांगून बाबांचे माहात्म्य इतर धर्माच्या लोकांनाही पटू लागल्याचे हेमाडपंतांनी दाखवून दिले आहे. त्यातून रतनजी हे श्रीमंत मिल कॉन्ट्रॅक्टर, तेव्हा बाबांची कीर्ति आणखी पसरली असणार! शिवाय रतनजीवर बाबांचा अनुग्रह झाला तोही विशेष प्रकारचा होता. या जगात प्रापंचिक लोक संतांकडे दोन गोष्टींकरिता धाव घेतात. एक तर कोठल्यातरी रोगाच्या, दुःखाच्या निवारणासाठी किंवा कोणतीतरी आपली इच्छा पुरी करून घेण्यासाठी. ह्या इच्छा किंवा ईषणा तीन प्रकारच्या असतात. पुत्रेषणा, धनेषणा आणि लोकेषणा, म्हणजे मान-सन्मानाची इच्छा. यातील पुत्रेषणा विशेषकरून आपल्या भारतात पुराणकालापासूनच फार जबर आहे. प्रपंच पुढे चालवायला मुलगा वारस हवा आणि मुलाने अग्नी दिल्याशिवाय सद्गति मिळत नाही, हा समज येथे प्रबळ आहे. त्यामुळे पुत्र मिळवून देणाऱ्या संतामागे लोकांची झुंबडच उडते. असो.

या अध्यायात आणखी एक बरेच मोठे (६६ ओव्यांचे), पण सुंदर आणि बोधदायक विवरण आले आहे. ते म्हणजे दक्षिणेचे. हेमाडपंतांनी मोठ्या कौशल्याने शास्त्रांचा आधार घेऊन बाबांच्या दक्षिणा घेण्याचे समर्थन केले आहे:

हे तों सर्व प्राकृत भक्त। सर्वथैव प्रपंचासक्त।
दक्षिणादानें शुद्धचित्त।
व्हावेत हें मनोगत बाबांचें।।१३४।।

'यज्ञेन दानेन तपसा' ही श्रुति। आत्मज्ञानोत्सुकाहीप्रती।
दक्षिणाप्रदान साधन युक्ती।
स्पष्ट वचनोक्ति सांगते।।१३५।।

भक्त स्वार्थी वा परमार्थी। दोघांसी व्हावी इष्टप्राप्ति।
तरी दक्षिणा निजगुरुप्रती।
निजहितार्थी द्यावी कीं।।१३६।।

आणि हे करता करता प्रजापतींनी देव, दैत्य व मानवासकट आपल्या तीन अपत्यांना केलेल्या 'द' या एकाक्षर उपदेशाची बृहदारण्यक उपनिषदातील गोष्ट सांगून ते म्हणतात:

बाबाही 'द'कारें भक्तांप्रत। भक्तहितार्थ तेंचि मागत।
करा दया दान व्हा दान्त।
सौख्य अत्यंत लाधाल।।१४६।।

आणि पुष्टीसाठी गीतेतील १६ व्या अध्यायातील २१ वा श्लोक उध्दृत करून त्याचा अर्थही सांगतात.

काम क्रोध लोभ जाण। हीं नरकाचीं द्वारें तीन।

यांचे पायीं आत्मविनाशन।
यदर्थ निक्षून त्यागावें॥१५०॥

परंतु त्यातही '**मानवां गांजी लोभ दुर्धर**' म्हणून हेमाडपंत दान कसे करावे हे शिकविण्यासाठी तैत्तिरीय उपनिषदातील अनेक दान प्रकार सांगतात.

**देणें नित्य श्रद्धेनें द्यावें। विनाश्रद्धा दिधलें न पावे।**
**राजाज्ञे शास्त्राज्ञे भ्यावें। लज्जेनें द्यावें कांहीतरी॥१४४॥**

**विवाहादि लोकाचार। तेथेंही देणें लागे अहेर।**
**देऊनि राखावा मित्राचार।**
**लोकव्यवहार-शिक्षा ही॥१४५॥**

आणि हे ऐकता ऐकता या सत्‌चरितातील पुढील अध्याय ४७ मधील ओवी मला आठवली ती सांगतो:

**प्रेमेंवीण भिडेभाडें। पडतां आग्रह अथवा सांकडें।**
**जें दिधलें तें देवा नावडे। गोडीचें थोडेंही बहु मोल॥१०१॥**

आणि तसाच याबद्दलचा गीतेतील अध्याय १७ तील श्लोकही सांगतो:

**दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे।**
**देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम्॥२०॥**

दान करणे हे आपले कर्तव्य आहे असे समजून, देश, काल व पात्र (घेणाऱ्याची योग्यता) पाहून आपल्यावर उपकार न करणाऱ्यास जे दान दिले जाते त्याला सात्विक (उत्कृष्ट) दान म्हणतात.

एकूण हा अध्याय म्हणजे जणूकाय:

**भावभक्तीची शिरापुरी। कितीही खा सदा अपुरी।**
**जरी आकंठ सेविली तरी। तृप्ति न परिपूर्ण कधींही॥३६॥**

## श्री साईभक्तांना नम्र आवाहन

श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाच्या वतीने विविध विकास योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत. ह्या योजनांसाठी विशेष स्वरुपाच्या देणग्या स्वीकारण्यात येणार आहेत. यासंबंधीची माहिती पुढीलप्रमाणे:

'साईबाबा भक्तनिवासस्थान' या इमारतीचे बांधकाम सुरू झाले असून रु. ५०,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील एका खोलीला देण्यात येईल. रु. २,००,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव या इमारतीतील जनरल हॉलला देण्यात येईल. ह्या देणगीदारांना वर्षातून दोनदा आगाऊ एक महिना कळविल्यास तीन दिवस रहाण्यासाठी विनामूल्य जागा देण्यात येईल.

मंदिर-नूतनीकरणासाठी रु. १,००,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

रुग्णालय-विस्तारीकरणासाठी रु. ५,००,००० अगर त्याहून अधिक रकमेची देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव एका वॉर्डला अगर ऑपरेशन थिएटरला देण्यात येईल. रु. २०,००० देणगी देणाऱ्या देणगीदाराचे नाव एका बेडला देण्यात येईल. रु. १०,००० अगर त्याहून अधिक देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव बोर्डावर लिहिण्यात येईल.

**"जयां माझी आवड मोटी। तयांचे मी अखंड दृष्टीं। तयां मजवीण ओस सृष्टी। माझियाच गोष्टी तया मुखीं॥१४८॥ तयां माझें अखंड ध्यान। जिव्हेसी माझेंच नामावर्तन। करूं जातां गमनागमन। चरित्र गायन माझें तयां॥१४९॥ ऐसें होतां मदाकार। कर्माकर्मी पडेल विसर। जेथें हा मत्सेवेचा आदर। तिष्ठें मी निरंतर तेथेंचि॥१५०॥ मज होऊनि अनन्य-शरण। जया माझें अखंड स्मरण। तयाचें मज माथां ऋण। फेडीन उद्धरण करूनियां॥१५१॥ आधीं मज न दिधल्यावांचून। करितां भोजन-रसप्राशन। जया माझें हें निदिध्यासन। तयाआधीन मी वर्तें॥१५२॥ माझेंच जया भूकतहान। दुजें न ज्यातें मजसमान। तयाचेंच मज नित्य ध्यान। तयाआधीन मी वर्तें॥१५३॥ पितामाता गणगोत। आप्तइष्ट कांतासुत। यांपासाव जो परावृत्त। तोचि कीं अनुरक्त मत्पदीं॥१५४॥ वर्षाकाळीं नाना सरिता। महापूर समुद्रा मिळतां। विसरती सरितापणाची वार्ता। महासागता पावती॥१५५॥ रूप गेलें नाम गेलें। जळही जाऊनि सागरीं मिसळलें। सरिता-सागर लग्न लागलें। द्वैत हारपलें एकत्वीं॥१५६॥ पावोनि ऐसी समरसता। चित्त विसरलें नामरूपता। तें मजसि पाहील निजस्वभावता। नाहीं मजपरता ठाव तया॥१५७॥ परीस नव्हे मी दगड॥ ऐसें जना करावया उघड। पुस्तकपंडितीं करोनि बडबड। लोहाचे अगड आणिले"॥१५८॥**

–अध्याय ४४, श्री साईसत्‌चरित

जुन्यातलं सोनं

# महाराजांचे अनुभव

(श्री साईलीला, अंक ३, वर्ष ८ वें)

सन १९१३ सालीं माझे स्नेही श्री. गजानन महादेव कुळकर्णी ह्यांच्या आग्रहावरून माझें शिर्डीस जाणें प्रथमच झालें. त्या वेळीं मी ॲक्टिंग तलाठी होतों. स्थिति गरिबीची होती व अद्यापही आहे; परंतु मला महाराजांसारखी अत्यंत सांगड मिळाल्यामुळें सांप्रतच्या संसारसौख्याकडे (पाण्याच्या बुडबुड्याप्रमाणें) कितपत मी सौख्य मानून राहावें ह्याचा विचार फक्त श्री साईभक्तांसच अगर संतसमागम असणाऱ्यांसच करतां येईल.

१ ला अनुभव: वरील सनापासून तों आजतागायत त्यांचे दर गुरुवारीं आरतीचे क्रम त्यांच्या कृपेनें सुरू आहेत; परंतु मी अद्याप सरकार नोकरींत तलाठ्याच्या जागीं असल्यामुळें कदाचित् कांहीं गुरुवारीं प्रत्यक्ष त्यांनीं दिलेल्या पादुकांचें पूजन करून आरती करणें हा योग चुकत असतो, त्यास नाइलाज आहे.

२ रा अनुभव: माझे स्नेही रा. रा. लक्ष्मणराव खरे ह्यांच्या गड्याच्या ८-९ वर्षांच्या मुलास चूड नांवाचें विषारी जनावर चावलें. त्या वेळीं वरील गृहस्थ रात्रौ सुमारें ८।-८॥ वाजतां माझ्या घरीं येऊन म्हणाले कीं, "तुझ्या जवळ औषध आहे काय? असल्यास दे." त्या वेळीं मी जेवावयास बसलों होतों. माझ्या कुटुंबास मी देवांत असलेली उदी बाबांचें नांव घेऊन त्यांना दे, असें सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं उदी घेऊन आपल्या गड्यास दिली व गड्यानें पोटांत पाण्याबरोबर मुलास दिली. उदी पोटांत जातांक्षणींच मुलास झोंप लागून जनावराचें विष उतरलें असें सकाळीं तपास करितां समजलें. ह्यावरून मृत्युमुखीं गिळलेला प्राणी बाबांच्या उदीनें परत आला. हा उदीचा प्रभाव आहे हें सांईभक्तांसच मात्र कळून येईल, यांत शंका नाही.

मला बरेच वेळां असे उदीचे प्रसंग आले व त्यायोगे बाबांच्या उदीने गुण आला, त्याबद्दल मी बाबांचा जन्मोजन्मीं ऋणी आहें.

३ रा अनुभव: माझा मुलगा विश्वनाथ, वय ९ वर्षांचें. सुमारें १ फूट उंचीवरून दगडावर पडला. पडल्याबरोबर तो येवढेंच म्हणाला कीं, मला थंडी आली. त्या वेळीं मलेरियाचा ताप असावा असें समजून आम्ही मुलास अंगावर घालून तसेंच निजविलें. मुलगा स्वस्थ झोंपला आहे या सबबीवर आमच्या कुटुंबाने अगर मी कांहीं त्याला पाहिलें नाहीं. रात्रौ सात वाजतां मुलगा कां उठत नाहीं त्या वेळीं पाहातों तों मुलगा बेशुद्धींत. त्या वेळीं डॉक्टर बोलाविला. "मुलास वात झालेला, मुलाची स्थिति बरोबर नाहीं," असें माझ्या कांहीं मित्रांस डॉक्टरनें सुचविलें. एक डॉक्टर घाबरून घरीं बोलाविलें असतां येण्यांत अर्थ नाहीं असे त्यानें कळविलें; परंतु ज्यास श्री बाबा डॉक्टर आहेत त्यांच्यापुढें इतर मनुष्यरूपि डॉक्टर कसे असणार! असो! सरकारी डॉक्टर मात्र औषध देत होता. अखेर मुलाचा पुढील विधि होणार असें समजून ज्ञाती गृहस्थ जमले. इतक्यांत एक स्नेही म्हणाले, घाबरू नका. मुलाला जीव आहे. इतक्यांत माझी मेहुणी गंगारूपबाई हिनें उदी चमच्यानें तोंड उघडून तोंडांत घातली. ती पोटांत गेली किंवा नाहीं याची शंकाच! झालें! मुलगा ३ दिवस शुद्धींत नव्हता तो साधारण पाहूं लागला. प्रथम बाबांच्या तसबिरीकडे पाहून ताकद नसल्यामुळें हलक्या हातानें तसबिरीस नमस्कार केला. नंतर माझी मेहुणी गंगारूपबाई हिला नमस्कार केला व नंतर सर्वत्रांस केला. मुलगा मृत्यूच्या मुखांत पडलेला बाबांनीं परत दिला ह्यांत शंका नाहीं. हा उदीचा पराक्रम. श्री बाबांची लीला अगाध आहे. ती किती आहे हें मात्र सांईभक्तांसच कळेल, ह्यांत संशय नाहीं.

**—ल. म. प्रधान**
तलाठी, शाहापूर, जि. ठाणें.

---

(श्री साईलीला, अंक ३, वर्ष ८ वें)

अनुभव १ला: गेल्या आषाढ महिन्याची गोष्ट. आमांशाच्या विकारानें मी जवळ जवळ तीन आठवडे आजारी होतें. ताप पत्करतो; पण हें दुखणें अतिशय त्रासदायक. घरांत दुसरें वडील माणूस अगर मदत करण्यास कोणी नसल्यामुळें घरचीं सर्व कामें वेळेवर करून दुखणें कसें बाजूस ठेवावें लागतें तें फक्त ज्याला नेहमीं दुखण्याचे प्रसंग येतात त्यालाच समजेल.

मला थोडासा आराम पडावयास व माझ्या लहान मुलीला वरील विकार होण्यास एकच वेळ. झालें. दिवसांतून आठ दहा वेळ मुलीस ढाळ होऊं लागले. होता नव्हता तो सर्व

उपाय करून पाहिला; परंतु गुण नाहीं. त्यामुळें आम्हीं उभयतां भिऊन गेलों. दुसऱ्या कोणाच्या मदतीची अपेक्षा नसल्यामुळें श्री बाबांवरच पूर्ण भरंवसा ठेवला. त्याच रात्रीं श्री बाबांनी स्वप्न दृष्टांत देऊन सूचना दिली कीं, तुझ्या बाळ औषधाच्या पिशवींत जायफळ व कडू मायफळ आहे तें उदईक थंड पाण्यांत उगाळून दे, आजार नाहींसा होईल. झालें. श्री बाबांच्या आज्ञेप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळीं वरील औषध दिलें व चमत्कार काय सांगावा? तेव्हांपासून तिला एकही ढाळ झाला नाहीं. (यापूर्वी वरील औषध भाजून तुपांत उगाळून चाटण करून दोन वेळां दिलें होतें; पण गुण आला नव्हता.)

अनुभव २ रा: श्रीसाईबाबांच्या पवित्र क्षेत्रीं आम्हीं केव्हां एकदां जाऊं व समाधिदर्शनाचा लाभ घेऊं अशी एकसारखी तळमळ लागली होती. गेल्या गोकुळ अष्टमीस जाणें झालें नाहींच, परंतु त्या वेळीं विचार ठरविला कीं, श्री बाबांची कृपा असेल तर येत्या रामनवमीस आम्हांला ते तिकडे नेतील. माझ्या अल्प बुद्धीप्रमाणें श्री बाबांचें रोज चिंतन होत असे व त्याप्रमाणें मला प्रत्यक्ष शिरडीचा दर्शन लाभ (स्वप्नांत) मिळूं लागला. चैत्र महिना जवळ येऊं लागला. एके दिवशीं मला थोडीशी धास्ती वाटूं लागली कीं, शिरडी गांवांत आम्ही पूर्वी कधींही गेलों नसल्यामुळें व पदरीं लहान मूल आहे तरी तिकडच्या अडचणी कशा काय असतील कोण जाणें. हा विचार चालला असतां श्री बाबांनीं रात्रौ स्वप्नांत सांगितलें कीं, "पोरी, भिऊं नकोस. माझा भाऊसाहेब तुला नेण्यासाठीं पाठवून देतों. काळजी करूं नकोस."

रात्रौ १० च्या नागपूर एक्सप्रेसनें आम्ही उभयतां व मुलगी (वय तीन वर्षे) मिळून निघालों. आमच्या डब्यांत साकोरीचे एक इसम आपल्या मुलांसह बसले होते. त्यांचीही लहान दोन मुलें होतीं. मनमाड स्टेशनवर आम्ही सर्वजण उतरलों; व थोडें अंतर चालून गेलों असेल नसेल इतक्यांत एक इसम हातांत कंदील घेऊन येत असलेला दिसला. आमच्याबरोबर दुसरीं साकोरीचीं मुलें सुद्धां होती. परंतु त्या मनुष्यानें माझ्या हळू हळू चालत असलेल्या मुलीकडे पाहून विचारलें कीं, मी या मुलीस वर घेऊं का? मी उत्तर देवविलें कीं, नको, तिला चालावयाची हौस आहे, चालूं द्या. नंतर स्टेशनचा पूल उतरेपर्यंत वरील गृहस्थ आमच्याबरोबर चालत होते.

रजा नसल्यामुळें उत्सवाच्या दुसऱ्या दिवशीं आम्हांला शिरडीहून परतावें लागलें. निघण्यापूर्वी एक वेळ मशीद, समाधि व कांहीं भक्त यांना नमस्कार करून जावें म्हणून निघालों. दर्शन घेतां घेतां, समाधीजवळ आलों तों समाधीच्या डाव्या बाजूस स्टेशनवर दिसलेले गृहस्थ उभे असलेले दिसले. मनांत विचार आला कीं, यांना नांव विचारावें. चौकशी करतां त्यांचें नांव भाऊसाहेब घैसास म्हणून समजलें. त्या वेळीं आम्हां उभयतांस जो कांहीं श्री बाबांच्या लीलेचा हुंदका आला व डोळे प्रेमाश्रूंनीं भरून आले ते लिहून वर्णन करणें माझ्या शक्तिपलीकडचे आहे.

**–सौ. मनोरमा कृ. पेंडुरकर**
जव्हेरबाई बिल्डिंग, जुनें कुर्ले.

(श्री साईलीला, श्रावण, वर्ष ८ वें)

सुमारें दोन वर्षांपूर्वी मी साईबाबांस मुलीच्या लग्नाचा प्रश्न विचारला. "तूं कांहीं काळजी करूं नकोस. तोच मुलगा मी जुळवून आणीन" असें त्यांनी मला अभिवचन दिलें. गांवाहून वर्तमान आलें कीं, त्या मुलाला बराच हुंडा देऊन दुसरें कोणी आपली मुलगी देण्याच्या विचारांत असून त्याच वर्षी (इ.स. १९२९) मे चे सुमारास मुलाचें लग्न होणार आहे. हें वर्तमान वाचून मला चिंता पडली; परंतु साईबाबांनीं पुन्हा "भिऊं नकोस, तें सर्व दोन वर्षांत मी जुळवून आणीन" असा दृष्टांत दिल्यावर मी अगदीं बाबांचे चरणीं विश्वास ठेऊन बेफिकीर राहिलों. गेले फेब्रुवारी महिन्यांत मुलाचे मनांत कांहीं प्रेरणा होऊन त्यानें आपल्या इतर वडील माणसांकडून आपल्या वडिलांची चांगली समजूत घालून आपण एकदां एखादे मुलीस लग्नाचें वचन दिल्यावर द्रव्याच्या लोभानें तें वचन मोडणें मोठें पातक आहे, हें आपल्या वडिलांचे मनांत चांगलें बिंबवून दिलें. हें सर्व मी तर अगदी बाबांच्या इच्छेचाच खास प्रताप असें समजतों.

असो. गेले फेब्रुवारीचे आरंभास एकाएकीं मुलाचे वडिलानें आमचे गांवीं आमचे घरीं येऊन लग्नाचें बोलणें लाविलें; तेव्हां माझे कुटुंबास बाबांचे दयेची बालंबाल खात्री होऊन अगदीं आनंदानें सर्व वर्तमान मला लिहून कळविलें, आणि लवकर रजा घेऊन येण्यास विनंती केली. बिचाऱ्या आईचा जीव, आपल्या मुलीला इच्छित वर मिळतो हें पाहून वरचेवर बाबांचे गुण सर्वांस सांगत सुटली. मी गांवीं (मंगळुरास) गेल्याबरोबर तिचे आनंदाचे उद्गार निघाले कीं, "खरोखर बाबांनीच सर्व जुळवून आणिलें. मला तर अशा प्रकारानें गोष्टी घडून येतील अशी आशाच नव्हती."

लग्न यथासांग आमचे पद्धतीप्रमाणें आटोपलें. कोणतीही अडचण आली नाहीं. खर्चासंबंधानें देखील माझा ठाम विश्वास आहे कीं, बाबांनींच मला हातभार लावून मला द्रव्याची मदत दिली. आतां बाबांचे चरणांशी विनंती हीच कीं, त्यांनीं ह्या तरुण जोडप्यास सद्बुद्धि देऊन त्यांचा संसार नीट चालविण्यास हातभार लावावा.

**–गोपाळ गणेश भ्रियान**

(श्री साईलीला, भाद्रपद, वर्ष ८ वें)

आमचे वडील इ.स. १९११ साली श्री बाबांची कीर्ति ऐकून श्री क्षेत्र शिर्डी येथें श्री बाबांच्या दर्शनास गेले. पहिल्याच दर्शनी श्री बाबांनीं त्यांना सुमारें एक महिना ठेऊन घेऊन त्यांच्याकडून सेवा करून घेतली. त्यानंतर इ.स. १९१३ साली श्री बाबांच्या कृपेनें आमचा सर्व मंडळीसह बिऱ्हाड करण्याचा योग जुळून आला. त्या खेपेस श्री बाबांच्या पादुका देव्हाऱ्यांत पूजण्यास असाव्या म्हणून तयार करवून बरोबर घेतल्या. तेथें गेल्यावर त्या (पादुका) श्री बाबांस दाखविल्या. तेव्हां त्या (पादुका) श्री बाबांनीं हातांत घेऊन व आमच्या मनांतला हेतु ओळखून त्या (पादुका) दोन्हीं पायांच्या आंगठ्यांमध्यें धरून "फार छान दिसतात. तरी ह्या तुम्हीं घरीं नेऊन देव्हाऱ्यांत पूजा करावी" म्हणून त्या आम्हांस परत दिल्या. तेव्हांपासून आजतागायत त्यांची पूजाआरती आम्ही करीत आहोंत.

गेल्या दिवाळींत धनत्रयोदशीच्या दिवशीं सकाळी उठतां क्षणींच आम्हीं जों पादुकांचें दर्शन घेण्यास गेलों तों देव्हाऱ्यांत उजव्या पायांतली पादुका नाहीं असें आम्हांला आढळून आलें व तपासाअंतीं ती कोणीही हालविली नाहीं असें कळून आलें. शेवटीं घरांतलें सर्व सामान काढून पाहिलें परंतु तिचा पत्ता लागला नाहीं. आम्ही आमच्याकडून शक्य तितका तपास केला, परंतु पत्ता लागला नाहींच. पुढें ती राहिलेली पादुका पूजण्याचा क्रम चालू ठेविला. असें सुमारें दोन महिनेपर्यंत चाललें होतें. मात्र आमच्या मनांतून गेलेल्या पादुकेबद्दल विसर न पडतां मधून मधून इकडे पाहा तिकडे पाहा ही क्रिया चालूच होती. पुढें सुमारें दोन महिन्यांनी नित्यक्रमाप्रमाणें सकाळीं उठतां क्षणींच दर्शन घेण्यास जातों तों दुसरीही पादुका जागेवर नाहीं असें आढळून आलें. मात्र रात्रीं आरती करतांना पादुका जागेवर असल्याची आमची सर्वांची खात्री होती. आतां रात्रीं एकाएकीं ह्या पादुका जाव्या कशा ह्याचा विचार करितां हें कृत्य बाबांच्याशिवाय कोणाचें नाहीं अशी आमची घरांतल्या सर्व मंडळींची खात्री होऊन चुकली व त्या खेपेस आम्हीं तपास न करतां त्यांच्यावरच प्रेमानें आरोप घालून पादुका परत देण्याची प्रार्थना केली. दोन्ही पादुका एकाएकीं गेल्यामुळें श्री बाबांचा कांहीं तरी कोप झाला असें वाटून आम्हां घरांतल्या सर्व मंडळीस फार वाईट वाटलें, परंतु ती करुणामय माऊली भक्तांवर अशी केव्हा कोपते काय? तर त्या माऊलीच्या मनांतून तिचें आमच्या घरांत प्रत्यक्ष वास्तव्य असल्याची प्रचिती तिला दाखवावयाची होती. परंतु आमच्यासारख्या अज्ञान बालकांस हें कसें कळावें? तेव्हां ती माऊली आमच्यावर कोपली असेंच आम्हांस वाटूं लागलें ह्यांत नवल नाहीं. बरें. असो.

पुढें आपल्या नशिबीं श्री बाबांच्या हातच्या पादुका नाहींत अशा समजुतीनें आम्हीं दुसऱ्या तयार असलेल्या पादुका दुकानांतून आणाव्या म्हणून मी मुंबईस त्या आणण्याकरितां गेलों. परंतु लिहिल्यास कदाचित् आमच्या वाचकांस खरेंही वाटणार नाहीं, मला फिरतां येण्यासारख्या सर्व चांदीच्या दुकानांत पाहाण्याकरितां सुमारें दोन तीन तास फिरलों; परंतु एकाही दुकानांत तयार अशा मिळाल्या नाहींत. एका दुकानांत तर असें उत्तर मिळालें कीं, कालपर्यंत एक जोड होता, परंतु कालच तो जोड एकानें नेला. पुढें आयत्या मिळत नाहींत असे वाटून आमच्या ओळखीच्या सोनाराकडे जाऊन तयार करवाव्या म्हणून तसाच पुढें सोनाराच्या घरी गेलों; परंतु त्या माऊलीचीच इच्छा नसल्यामुळें त्या सोनाराच्या घराला कुलुप दिसून आले. आतां मात्र आपल्या माऊलीचा आपणांवर पूर्ण कोप झाला, असें वाटूं लागलें. शेवटीं पादुकांवाचून श्री बाबांच्या फोटोचीच पूजा करण्याचा क्रम पुढें चालू ठेविला. असे बरोबर नऊ महिने गेले. तेव्हां आमचा पादुकांबद्दल विसर पडत नाहीं असें जाणूनच कीं काय त्या करुणामय माऊलीला आमची करुणा येऊन तिनें त्या दोन्हीं पादुका फोटो असलेल्या पाटाखालीं आणून ठेविल्या. हें आम्हांस सकाळी जेव्हा सारवण्याकरितां पाट काढला तेव्हां ज्या रीतीनें आम्हीं पाटावर ठेवून पूजीत होतों त्याच रीतीनें त्याच पाटाखालीं दिसून आल्या. तेव्हां आम्हांस अत्यानंद वाटून आमच्या 'करुणामय माऊलीचे आमच्या घरांत वास्तव्य असल्याबद्दल आमची पूर्ण खात्री झाली. आतां हें कृत्य श्री बाबांचें नव्हे तर कोणाचें? नाहीं तर एकामागून एक अशा दोन महिन्यांच्या अंतरानें त्या जातात काय व नऊ महिन्यांनंतर त्याच पाटाखालीं दोनहीं सारख्या जोडीनें, म्हणजे श्रीक्षेत्र शिर्डी येथें समाधीजवळ ज्या स्थितीमध्यें त्यांच्या पादुका आहेत त्याच स्थितीमध्यें येतात काय! कदाचित वाचकवृंदांना असा संशय येईल कीं, तो पाट आम्हीं काढला नसेल. तरी श्री बाबांची जेथें पूजा होते तो पाट रोज काढून सारवण केल्याशिवाय कोण पूजा करणार? तर हा अनुभव वाचून श्री बाबांचें वास्तव्य असल्याबद्दल सर्व भक्तांची खात्री होईल. कळावें.

—आत्माराम हरिभाऊ चौबळ

अंधेरी.

---

(श्री साईलीला, आषाढ, शके १८५४)

श्रीसमर्थ साईबाबा समाधिस्थ होण्यापूर्वी कांहीं प्रेमळ भक्तांस सांगत कीं, 'मी माझे समाधींतूनही तुम्हांस हांक देईन.' त्याबद्दलचा माझा विलक्षण अनुभव आपणास कळवायचा विचार असून देखील माझ्या हातून तें घडलें नाहीं; त्याचें कारण श्री साईबाबांसच माहीत. मी तर एक पापी मनुष्य आहें. असो. आतां अनुभव लिहिण्यास सुरुवात करितों.

इ.स. १९२१ मध्यें मी माझ्या गांवीं आजारी असल्यामुळें,